किंमत - वार्षिक वर्गणी १००/- रुपये

# अर्थबोधपत्रिका

## मोजक्या वेळेत जगाबद्दलची जाण वाढविणारे उद्‌बोधक व माहितीपूर्ण मासिक


३● पुनर्विचार

५● आता गोमाता केवळ पुजेपुरतीच उरणार का ?

१७● शब्द आणि शब्दांच्या अलीकडले..

२३● परंपरेच्या 'बखरी'

२९● जिकडेतिकडे

३३● स्मरण, प्रेरक आणि मार्गदर्शक बोलांचे...



**खंड १४ : अंक ४** **जुलै २०१५**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी**


वार्षिक वर्गणी १००/- रुपये (**परदेशस्थ वाचकांसाठी $ २०**) वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.** **'अर्थबोधपत्रिका'** दर महिन्याच्या १० तारखेला पोस्टाने पाठविली जाते.

वर्गणीसाठी पत्ता : व्यवस्थापक,
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,
९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२, २५६५७२१०,
२५६५७६९७
ई-मेलः- ispe@vsnl.net
website- www.ispepune.org.in


**अर्थबोधपत्रिका**
**खंड १४ (अंक ४) जुलै २०१५**
**संपादक - अभय टिळक**
**निर्मिती-सहभाग - गिरिजा देशमुख**


*'अर्थबोधपत्रिकेतील माहिती कशी?*

- उद्‌बोधक, वाचनीय आणि रंजक
- अभ्यासपूर्ण आणि विश्लेषक
- निःपक्ष व साधार
- सोप्या भाषेतील आणि विचारप्रवर्तक

**अर्थबोधपत्रिकेचा हेतू**

**प्रतिष्ठित व अग्रगण्य नियत-कालिके, पुस्तके आणि इंटरनेटसारख्या माध्यमांद्वारे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर, मुख्यतः इंग्रजी भाषेत प्रकाशित होणारी जी माहिती मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी वेचक माहिती संदर्भासह पुरविणे.**

*अर्थबोधपत्रिका कशी साकारते?*

- मूळ इंग्रजी संदर्भाचा शोध व वाचन
- निवडक साहित्याचे संकलन
- संकलित साहित्याला अन्य पूरक माहितीची जोड
- संकलित माहितीच्या आधारे नव्याने लेखन. मूळ इंग्रजी संदर्भाचा केवळ अनुवाद नव्हे.

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, ही विनंती.

◆अंकातील लेख आपण नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. मात्र, लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.**यासाठी संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.**

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी**

# पुनर्विचार

अर्थकारण आणि राजकारण यांच्यादरम्यानचे नाते मोठे मजेशीर आणि तितकेच चमत्कारीक असते. एक तर या दोन प्रांतांच्या स्थायीभावात दोन ध्रुवांइतके दुर्लंघ्य अंतर. ज्या तात्कालिकाचे अर्थकारणाला पूर्ण वावडे त्याचीच नेमकी राजकारणाला असोशी. लोकांच्या भावभावनांना आवाहन करण्यावर राजकारणाचा भर तर, सर्वसामान्यांच्या विवेकाला हाक घालण्याचा अर्थकारणाचा स्वभाव. त्यांमुळे, प्रत्यक्ष व्यवहारात या दोन प्रांतांचे एकमेकांशी फारसे जुळताना दिसत नाही. पण याचा अर्थ ही दोन क्षेत्रे परस्परांपासून एकदम फटकून असतात, असेही नाही. कारण, तसे झाले तर कोणताच व्यवहार पाऊ ल उचलणार नाही. त्यांमुळे, 'तुझे नि माझे जमेना आणि तुझ्यावाचून करमेना', या तडजोडीला अनुसरत दैनंदिन जीवनात या दोन प्रांतांचे एकमेकांशी व्यवहार चालू असतात. घरीदारी आज घडताना दिसते ते नेमके हेच. यांतून वारंवार मोठे गंभीर प्रश्न उपस्थित होत असतात. त्यांमुळेच, राजकारण आणि अर्थकारण यांच्या परस्परसंबंधांचा पाया निकोप कसा बनवावा यांबाबत पुन्हा एकवार नव्याने चिंतन मांडण्याची निकड जाणवायला लागते. आजच्या ग्रीसमध्ये घडते आहे ते नेमके हेच. २००८ सालातील वित्तीय अरिष्टानंतर उद्भवलेल्या आर्थिक संकटाला तोंड देण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून अपरिहार्य बनलेल्या आर्थिक शिस्त व निर्बंधांना तिलांजली देण्याचे आश्वासन देत ॲलेक्सिस सिप्रस यांनी चालू वर्षाच्या जानेवारी महिन्यात ग्रीसमधील सत्ता संपादन केली. ग्रीसच्या अर्थव्यवस्थेचे दीर्घकालीन हित सरसहा नजरेआड करत केवळ तात्कालीक राजकीय व पक्षीय लाभांवर नजर ठेवून सिप्रस यांनी मतदारांना भावनिक आवाहन केले. गेली सुमारे पाच ते सहा वर्षे आर्थिक संकटाच्या लपेट्यात आलेल्या ग्रीसच्या अर्थव्यवस्थेला तारण्यासाठी युरोपीय कमिशन, युरोपीय मध्यवर्ती बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी या तीन धनकोंनी आजवर केलेल्या अर्थसाहाय्यापोटी जारी केलेल्या अटींचे पालन करण्याच्या मुद्याचा थेट संबंध सिप्रस यांनी ग्रीसच्या आत्मगौरवाशी जोडत अर्थकारणातील



त्या सलणा-या काट्याचा अकारण राजकीय नायटा बनवला. त्यामुळे सगळाच प्रश्न मुळातून नासला आणि ग्रीससह संपूर्ण युरोपीय समुदाय एका नव्या कडेलोटाच्या टोकावर ढकलला गेला ! आपला देशही याला अपवाद नाही. महाराष्ट्रात अलीकडेच जारी झालेल्या गोवंशहत्याबंदीची आठवण या संदर्भात व्हावी. अगदी व्यवसाय म्हणून जरी नाही तरी, घरच्यापुरती का होईना मोजकी दुभती जनावरे पाळणारा शेतकरीही अंतिमतः त्या सगळ्या खटाटोपाच्या आर्थिक परिमाणांकडे काणाडोळा करत नसतो. त्याच वेळी, केवळ राज्यातीलच नव्हे तर देशभरातील गोधनाच्या संख्येमध्ये व जडणघडणीत अलीकडील काळात कशा प्रकारचे बदल घडून येत आहेत, यांकडेही बारकाईने बघितले जायला हवे. आपल्या देशातील एक ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. नीळकंठ रथ यांनी देशातील गोधनामध्ये साकारत असलेल्या बदलांचा आलेख अक्षरबद्ध केलेला लेख या अंकात त्यासाठीच मुद्दाम सादर केलेला आहे. ***(कृपया पृष्ठ क्रमांक ३६ पाहावे).***

## वाचकांना विनंती

'अर्थबोधपत्रिके'चा अंक दर महिन्याच्या १०तारखेला पोस्टाद्वारे पाठविला जातो. २५ तारखेपर्यंत अंक न मिळाल्यास प्रथम आपल्या पोस्टात चौकशी करावी व नंतरच आमच्याकडे लेखी तक्रार करावी. अंक शिल्लक असल्यास पुढील महिन्याच्या अंकाबरोबर पाठविला जाईल.

**माहितीसाठी - 'अर्थबोधपत्रिके'चे मागील अंक संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. त्यासाठी www.ispepune.org.in इथे वाचकांनी अवश्य भेट द्यावी.**

## निवेदन

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा वेबसाइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

सामाजिक

# गोधनाची घटती संख्या...

## आता गोमाता केवळ पुजेपुरतीच उरणार का ?

• नीळकंठ रथ

आपल्या देशातील गोधनात आणि गोधनाच्या संख्येत अतिशय मूलभूत स्वरूपाचे स्थित्यंतर घडून येत असल्याची चिन्हे अलीकडील काळात दृग्गोचर होत आहेत (या ठिकाणी व इथून पुढे लेखात सर्वत्र 'गोधन' या संज्ञेत गाई, बैल, गो-हे, कालवडी, खोंड या सगळ्यांचा अंतर्भाव केलेला आहे). १९५६ ते १९६० या पाच वर्षांच्या काळात आपल्या देशातील गोधनाच्या संख्येत दरवर्षी सरासरी दोन टक्के दराने वाढ घडून येत होती. त्याच काळात, वार्षिक सरासरी वाढीचा हाच दर ओडिशामध्ये साडेचार टक्के असा होता; तर, उत्तर प्रदेशात ही वाढ दरसाल सरासरी २.७ टक्के दराने घडून येत होती. गोधनामधील वार्षिक वाढीचा हा दर, जवळपास, देशाच्या लोकसंख्यावाढीच्या दराइतकाच होता. देशातील दर १०० व्यक्तींमागे ५० गोधन असे चित्र त्या काळात दिसत होते. एकंदरीने, सगळीच परिस्थिती हाताबाहेर जाण्याची भीती त्या काळात वाटत असे.

परंतु, त्या पुढील अर्धशतकभरात ते चित्र सुदैवाने पालटले. १९९२ सालातील आकडेवारीनुसार त्या वर्षी देशात एकूण गोधन होते २० कोटी इतके. दर १०० व्यक्तींमागे २३ असे ते प्रमाण भरले. त्या नंतरच्या दोन दशकांदरम्यान देशातील गोधनामध्ये जवळपास ६.६९ टक्क्यांची घट घडून येऊन गोधनाची संख्या २० कोटींवरून १९ कोटींपर्यंत खाली आल्याचे संबंधित आकडेवारी आपल्याला सांगते.

परंतु, या बदलाचे अंतरंग अधिक बारकाईने न्याहाळावयास हवे. कारण, आपल्या देशातील देशी गोधन आणि संकरित वाणाचे परदेशी गोधन या दोहोंतील बदलांची दिशा या काळात भिन्नभिन्न राहिलेली दिसते.



संकरित वाणाच्या परदेशी गोधनाची संख्या सातत्याने वाढत असल्याचे वास्तव पुढे येते आहे. एकंदर गोधनामध्ये संकरित वाणाच्या गोधनाचे संख्याबळ १९९२ साली साधारणपणे दीड कोटीच्या आसपास होते. २०१२ साली तीच संख्या पोहोचलेली दिसते जवळपास चार कोटींच्या परिघात. संकरित वाणाच्या गोधनाचे देशातील एकूण गोधनामध्ये १९९२ साली असणारे सात टक्क्यांचे प्रमाण तिपटीने उंचावून २०१२ साली २१ टक्क्यांवर पोहोचलेले होते. एकूणांतून हे संकरित वाणाचे गोधन वगळले तर आपल्या ध्यानात येते ते असे की, १९९२ ते २०१२ या काळात देशी वाणाच्या गोधनाच्या संख्येत साधारणपणे १९ कोटींवरून जवळपास १५ कोटींपर्यंत घट झालेली आहे. म्हणजेच, २० वर्षांच्या काळात देशी वाणाच्या गोधनामध्ये जवळपास २० टक्क्यांनी घसरण घडून आलेली दिसते.

देशी वाणाच्या बैलांची संख्या घटल्यामुळेच मुख्यतः एकूण देशी गोधनाच्या संख्येत ही घट झालेली आहे. २००३ साली देशी वाणाच्या बैलांची आपल्या देशातील एकूण संख्या होती जवळपास ७ कोटी ७५ लाख इतकी. २००७ सालापर्यंत या संख्येत अंमळ घट घडून आली व ती ७ कोटी ६७ लाखांपर्यंत उतरली. मात्र, २००७ ते २०१२ या पाच वर्षांच्या काळात तीच संख्या झपाट्याने खालावून ६ कोटी १९ लाखांपर्यंत घसरली. २००३ ते २०१२ या दशकभरादरम्यान देशी वाणाच्या बैलांची संख्या सुमारे १ कोटी ५६ लाखांनी घटली.

देशी वाणाच्या बैलांची संख्या घटण्यामागील कारण अतिशय सोपे व सरळ आहे. आपल्या देशात दर शेतकरी कुटुंबामागील सरासरी लागणी क्षेत्र काळाच्या ओघात सातत्याने आणि लक्षणीयरीत्या आकुंचन पावत आलेले दिसते. पदरी जमीन असलेल्या आपल्या देशातील एकूण शेतक-यांपैकी तीन चतुर्थांशांपेक्षा अधिक शेतकरी हे लहान शेतकरी आहेत. म्हणजेच, त्यांच्याकडे दोन हेक्टरपेक्षा कमी जमीन आहे (लहान शेतक-यांचा विचार केला तर या गटात धारणक्षेत्राचे सरासरी आकारमान अवघे ०.६७ हेक्टर म्हणजे १.७८ एकर इतकेच भरते). परिणामी, एखादा बैलही पदरी बाळगणे बहुसंख्य लहान शेतक-यांना जड जाते, मग बैलजोडी सांभाळण्याची तर बातच सोडा. नांगरटीच्या कामासाठी हा शेतकरी वर्ग

एकतर दुस-या शेतक-यांची बैलजोडी आणून आपल्या शेतात नांगर धरतो अथवा थेट ट्रॅक्टरच भाड्याने आणूण आपले शेत नांगरून घेतो. मोठे शेतकरीदेखील जवळ बैलजोडी बाळगण्यापेक्षा ट्रॅक्टरलाच अधिक पसंती देताना दिसतात. शेतकरी त्यांचे बैल व्यापा-यांना विकतात आणि पुढे व्यापारी त्याच बैलांची रवानगी खाटकांकडे करतात. गोवंशाबद्दल पूज्य भाव मनात बाळगणा-या या हिंदुधर्मीय शेतक-यांना त्यांच्या बैलांचे हे भागधेय ठाऊक असते मात्र ते हतबल असतात. कारण, बैल पदरी बाळगल्याने अखेरीस बैल आणि आपले कुटुंब या दोहोंच्या भाळी उपासमारच लिहिलेली आहे, हे त्यांना पुरते उमगलेले असते.

देशी वाणाच्या बैलांची संख्या घटण्यास या पूर्वीच प्रारंभ झालेला आहे आणि आता देशी वाणाच्या गाईंची संख्यादेखील त्यांच्याच पावलावर पाऊल टाकताना दिसते. २००७ ते २०१२ या पाच वर्षांच्या कालावधीदरम्यान देशातील गाईंच्या संख्येमध्ये वाढ घडून आल्याचे आकडेवारी सांगत नाही (किंबहुना, देशी वाणाच्या गाईंच्या संख्येत पहिल्यांदाच अंमळ घट झालेली दिसते). दुसरीकडे, एकंदर गोधनामध्ये संख्येने आणि प्रमाणाने वाढत्या राहिलेल्या संकरित वाणाच्या परदेशी गाईंनी दुधाचा पुरवठा वाढता राहण्याची तरतूद केलेली आहे. देशातील एकूण गोधनामध्ये संकरित गोधनाचे प्रमाण आजमितीला जवळपास एक पंचमांशाहून अधिक आहे. देशी वाणाच्या गाईबैलांच्या संख्येत भविष्यात हळूहळू घटच होत जाईल. किंबहुना, देशातील एकंदरच गोधनाच्या संख्येला येत्या काळात ओहोटी लागेल. ते स्वाभाविकच ठरते. कारण, दुधाची वाढती गरज संकरित वाणाच्या गाई आणि म्हशी पुरवत राहतील. त्याच वेळी, बैल ठेवणे परवडण्याजोगे नसल्याने बैलांच्या संख्येतही उतरती भाजणी दिसून येईल.

हे झाले देशपातळीवरील चित्र. मात्र, राज्याराज्यांतील वास्तव यांपेक्षा निराळे दिसते. महाराष्ट्र, ओडिशा, गुजरात आणि तामिळनाडू या चार राज्यांतील गोधनाचे वास्तव आपण अधिक तपशीलाने इथून पुढे न्याहाळणार आहोत. या चारांपैकी महाराष्ट्रात गोवंशाच्या हत्येवर अलीकडेच राज्य सरकारने बंदी जारी केलेली आहे. ओडिशातील गोधनाच्या संख्येतील वाढीचा वार्षिक सरासरी वेग सुमारे अर्धशतकापूर्वी उभ्या देशात सर्वाधिक



होता. गुजरातमधील गोधनात २५.२ टक्के अशी देशभरातील पाच राज्यांपैकी सर्वाधिक वाढ घडून आलेली आहे (राजस्थान, उत्तर प्रदेश, छत्तीसगड आणि आसाम या अन्य चार राज्यांचा क्रमांक गुजरातच्या खालोखाल या बाबतीत लागतो. या चार राज्यांतील गोधनामध्ये अनुक्रमे ९.९४ टक्के, ३.५७ टक्के, ३.४१ टक्के आणि २.६५ टक्के अशी वाढ झाल्याचे दिसते). तर, तामिळनाडूतील गोधनामध्ये देशभरात सर्वाधिक घट घडून आल्याचे संबंधित आकडेवारीवरून ध्यानात येते.

महाराष्ट्रातील गोधन २००७ साली जवळपास १ कोटी ६२ लाखांच्या घरात होते. २०१२ सालापर्यंतच्या पाच वर्षांत गोधनाच्या एकंदर संख्येमध्ये सात लाखांनी घसरण होऊन ती संख्या १ कोटी ५५ लाखांपर्यंत खाली आलेली होती. परंतु इथे नोंदविण्याजोगी बाब म्हणजे संकरित वाणाचे परदेशी बैल आणि देशी वाणाच्या गाईबैलांच्या संख्येतच मुख्यतः घट झालेली होती. तर दुसरीकडे, संकरित वाणाच्या गाईंची संख्या ६ लाख ३० हजारांनी वाढलेली दिसते. संकरित वाणाच्या गोधनामध्ये संकरित बैलांचे प्रमाण २००७ साली जवळपास १७ टक्क्यांच्या आसपास होते. २०१२ सालादरम्यान तेच प्रमाण १२ टक्क्यांपर्यंत उतरलेले दिसते. जन्माच्या वेळी गोधनामध्ये कालवडी व गो-हे यांचे प्रमाण मनुष्यमात्रांप्रमाणेच साधारणपणे सारखेच असते, ही बाब या संदर्भात आवर्जून नोंदवून ठेवावयास हवी. असे असूनही संकरित वाणाच्या गोधनामध्ये संकरित बैलांचे प्रमाण तुलनेने खूपच कमी दिसते. संकरित वाणाचे बैल निरुपयोगी असतात अशी भावना शेतक-यांमध्ये वसत असल्याने त्यांची गच्छंती लौकरात लौकर करण्याकडे त्यांचा कल असतो. २०१२ सालातील आकडेवारीनुसार संकरित बैलांचे महाराष्ट्रातील एकंदर संकरित गोधनामधील प्रमाण होते अवघे एक अष्टमांश इतके. परंतु, याहीपेक्षा अधिक लक्षवेधी बाब म्हणजे, २००७ ते २०१२ या काळात राज्यातील देशी बैलांच्या संख्येतही ७६ लाख ३० हजारांवरून ६७ लाख ८० हजारांपर्यंत घट घडून आलेली दिसते. ही घट जवळपास साडेआठ लाखांची भरते. परंतु, याहीवरची कडी म्हणजे, याच पाच वर्षांच्या काळात महाराष्ट्रातील देशी गाईंच्या संख्येतही ५४ लाख ३० हजारांवरून ५० लाख ५३ हजारांपर्यंत घट झालेली होती. देशी वाणाच्या

गाईंच्या संख्येत झालेल्या या घसरणीची भरपाई सुमारे सहा लाखांनी वाढलेल्या संकरित वाणाच्या गाईंनी केलेली दिसते. म्हणजेच, या पाच वर्षांत १२ लाखांहून अधिक गोधनाची रवानगी कत्तलखान्यांकडे बहुशः केली गेली. आता, गोवंशाच्या हत्येवर महाराष्ट्र सरकारने पुरती बंदी जारी केल्याने आता या पुढील काळात ते कोठे जाईल ?

ओडिशातील परिस्थिती मात्र ब-यापैकी वेगळी आहे. गेल्या ५० वर्षांच्या कालखंडात राज्यातील गोधनातील वाढीमध्ये लक्षणीय बदल झाल्याचे लक्षात येते. ज्या ओडिशा राज्यात १९५६ ते १९६० या काळात दरवर्षी सरासरी साडेचार टक्के दराने गोधन वाढत राहिले त्याच ओडिशातील गोधनाच्या संख्येमध्ये २००७ ते २०१२ या पाच वर्षांच्या काळात ५.६ टक्क्यांची घट घडून आली. म्हणजेच, दरवर्षी सरासरी एक टक्का दराने घसरण झाली. ही बाब स्वागतार्हच म्हणायला हवी. पण, बस्स तेवढेच ! संकरित गोधनाचे ओडिशातील एकूण गोधनामध्ये असणारे प्रमाण २००७ साली १४ टक्के इतके होते. २०१२ साली तेच प्रमाण ११ टक्क्यांपर्यंत उतरलेले दिसते. त्यांतल्या त्यांत दिलासादायक बाब म्हणजे, संकरित गोधनातील या बदलात मुख्य वाटा होता तो संकरित बैलांच्या संख्येत ८ लाख ८० हजारांवरून ३ लाख २० हजारांपर्यंत घडून आलेल्या घसरणीचा आणि संकरित गाईंच्या संख्येमध्ये झालेल्या वाढीचा. देशी बैलांच्या संख्येत मात्र ओडिशामध्ये नजरेत भरेल असा काहीही फरक पडलेला दिसत नाही. परंतु, नोंद घ्यावी अशी रोचक बाब म्हणजे, याच काळात ओडिशातील देशी गाईंच्या संख्येमध्ये ५० लाख ३० हजारांवरून ४८ लाख १० हजारांपर्यंत घट घडून आल्याचे ध्यानात येते. २०१२ साली ज्या वेळी पशुधनाचे सर्वेक्षण तिथे चालू होते त्या वेळी दुभत्या गाईंच्या संख्येतही घसरण झालेली दिसत होती. दुसरीकडे, संकरित वाणाच्या दुभत्या गाईंच्या वाढलेल्या संख्येने देशी दुभत्या गाईंच्या संख्येतील घसरणीची भरपाई केलेली दिसते. बस्स. याच्या पलीकडे काही नाही. मागे, १९६० साली ओडिशा राज्याच्या विधानमंडळाने एक कायदा मंजूर केला होता. गोवध बंदी कायदा, १९६० (१९६१ चा पाचवा कायदा) असे त्या कायद्याचे नाव होते. अर्थात, शारीरिकदृष्ट्या अपंग झालेल्या, रोगी आणि/किंवा १८ वर्षांपेक्षा अधिक



वय असलेल्या गोधनाचा वध करण्यास कायद्यामध्ये वाव ठेवण्यात आला होता. मात्र, त्यासाठी सक्षम अधिका-याकडून तसे प्रमाणपत्र घेणे बंधनकारक होते. हा कायदा अस्तित्त्वात असल्यामुळेच असेल कदाचित पण, संकरित बैलांची हत्याही २००७ सालापर्यंत ओडिशामध्ये केली जात नसे. ओडिशा, बिहार आणि पश्चिम बंगाल या राज्यांतून अलीकडील काही वर्षांत गोधनाची बेकायदेशीर निर्यात बांगला देशामध्ये व्यापक प्रमाणावर केली जाते. देशाच्या उत्तर तसेच पश्चिम भागातील काही राज्येही या अशा निर्यातीमध्ये मागे नाहीत. बांगला देशामध्ये दरवर्षी कत्तल केल्या जाणा-या गोधनापैकी जवळपास दोन तृतीयांश गोधन तिथे बाहेरून आयात केलेले असते. कातडी, शिंगे, चामडे आणि कातड्यापासून बनवलेल्या वस्तू बांगला देशामधून मोठ्या प्रमाणावर निर्यात केल्या जातात. गोधनाच्या वाहतुकीबाबतही ओडिशामध्ये काही बंधने लागू केलेली आहेत. अनुत्पादक गोधनाची विल्हेवाट लावण्यावर शेतक-यांना कायद्याने बंदी केल्यामुळे अन्य कोणत्याही अधिक प्रगत राज्यातील गोधनाचे व त्यावर बेतलेल्या अर्थकारणाचे चित्र जसे दिसेल तसेच आजच्या ओडिशाचे रंगरूप या बाबतीत दिसते.

देशातील अन्य राज्यांच्या तुलनेत गुजरातमधील परिस्थिती वेगळीच राहिलेली आहे. २००७ ते २०१२ या पाच वर्षांच्या कालावधीदरम्यान गोधनाच्या संख्येमध्ये वाढ दर्शविणा-या पाच राज्यांमध्ये गुजरातमधील गोधनात घडून आलेली २५.२ टक्क्यांची वाढ ही सर्वाधिक भरते. देशी तसेच संकरित अशा दोन्ही वाणांच्या गाईंच्या संख्येत भर पडल्याने ही सगळीच्या सगळी वाढ वास्तवात उतरल्याचे संबंधित आकडेवारीवरून आपल्या ध्यानात येते. संकरित गोधनाचे गुजरातमधील एकंदर गोधनामध्ये असणारे प्रमाण २००७ साली १४ टक्क्यांपेक्षा अंमळ अधिक होते. तर, एकूण संकरित गोधनामध्ये संकरित बैलांचे असणारे प्रमाण १९ टक्क्यांपेक्षा कमी होते. या बाबतीत गुजरातचे चित्र ओडिशाच्या तुलनेत वेगळे दिसते. गुजरातमधील शेतकरी त्यांच्याकडील संकरित बैल काढून टाकतात, हेच यावरून सूचीत होते. देशी बैलांच्याबाबतीतही हेच चित्र दिसते मात्र त्याचे प्रमाण तुलनेने कमी आहे. एकंदर गोधनामध्ये बैलांचे प्रमाण भरते जवळपास ४८.५ टक्क्यांच्या घरात. २०१२ सालापर्यंत मात्र देशी तसेच संकरित

बैलांच्या संख्येत चांगली ८.८ टक्क्यांची घट झाल्याचे दिसते. मात्र, देशी तसेच संकरित गाईंच्या संख्येमध्ये मात्र याच काळात घसघशीत वाढ झालेली दिसते. देशी आणि संकरित वाणाच्या गाईंच्या संख्येमध्ये ७७ लाखांवरून ९९ लाखांपर्यंत वाढ घडून आल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होते. संकरित गाईंच्या संख्येमध्ये ९ लाख ३० हजारांवरून १७ लाख ३० हजारांपर्यंत वाढ घडून आल्याचे दिसत असतानाच, दुसरीकडे, देशी गाईंच्या संख्येमध्ये ३५ लाखांवरून ५० लाखांपर्यंत वाढ झाल्याचे वास्तव पुढ्यात येते. गुजरातमधील हे चित्र अन्य अनेक राज्यांतील चित्रापेक्षा वेगळे दिसते. दुधाच्या उत्पादनाच्याबाबतीत देशातील एक अग्रेसर राज्य असा गुजरातचा लौकिक आहे. गीर ही देशी गाईंचा एक दुधाळ वाण या प्रांतात पूर्वीपासूनच विपुल प्रमाणात आढळतो. परंतु, या चित्राचाच आणखी एक पैलू दुर्लक्षण्याजोगा नाही. गाईंच्या संख्येमध्ये भरीव वाढ घडून आलेली दिसत असली तरी, बैलांच्या संख्येत मात्र गुजरातमध्ये लक्षणीय अशी घट झालेली आहे. हे जे व जसे घडले त्याला कोणत्याही प्रकारचा प्रतिबंध केला गेला असता तर काय घडले असते, याची केवळ कल्पना केली तरी पुरे.

तामिळनाडूमधील वास्तव म्हणजे जणू आरसाच ठरावा. गोवंशवधबंदी सारखे निर्बंध लागू केले गेले नाहीत तर अन्य राज्यांत गोधनाच्याबाबतीत कसे चित्र दिसेल याची झलक आपल्याला तामिळनाडूमध्ये बघावयास मिळते. संकरित वाणाच्या परदेशी गोधनाचा प्रवेश अन्य राज्यांच्या तुलनेत तामिळनाडूमध्ये बराच आधी झालेला होता. संकरित वाणाचे राज्यातील एकंदर गोधनामध्ये असणारे प्रमाण २००७ सालापर्यंत जवळपास दोन तृतीयांशांपर्यंत (६६ टक्के) उंचावलेले होते. तर, त्या नंतरच्या केवळ पाचच वर्षांत, म्हणजे, २०१२ साली हेच प्रमाण उंचावून पोहोचले होते ७२ टक्क्यांवर. इथे आवर्जून नोंद घ्यावी अशी बाब म्हणजे, २००७ ते २०१२ या काळात राज्यातील सर्वच प्रकारच्या गोधनामध्ये घट घडून आल्याचे संबंधित आकडेवारीवरून आपल्या ध्यानात येते. संकरित वाणाच्या गाईबैलांच्या संख्येत या काळात १ कोटी १२ लाखांवरून ८८ लाखांपर्यंत घसरण घडून आली. टक्केवारीच्या भाषेत बोलायचे तर ही घट भरते २१.२ टक्क्यांची. देशी गोधनाच्याबाबतीत घडून आलेली अशी संख्यात्मक घट अधिकच तीव्र



होती. तामिळनाडूमधील देशी गोधन या काळात ३५.४ टक्क्यांनी घटले. संख्यात्मकदृष्ट्या सर्वाधिक घट झालेली दिसते ती बैलांच्या संख्येमध्ये. तामिळनाडूमधील बैलांच्या संख्येमध्ये जवळपास ४१ टक्क्यांनी घसरण झालेली दिसते; तर, दुसरीकडे गाईंच्या संख्येत मात्र तुलनेने कमी म्हणजे १४.८ टक्क्यांची घट झाल्याचे आकडेवारी सांगते. त्यांतल्या त्यांतही पुन्हा, तुलनेने मोठी घट घडून आली ती देशी गाईंच्या संख्येत. तामिळनाडूतील देशी गाईंची संख्या २००७ ते २०१२ या पाच वर्षांच्या काळात तब्बल ३० टक्क्यांनी घसरली. गोवधबंदीसारखे निर्णय व्यवहारात लागू केले गेले नाहीत तर, येत्या दोन दशकभरांदरम्यान देशी गोधन तामिळनाडूमध्ये जवळपास नगण्यच बनावे.

ओडिशामधील शेतीचे व पशुपालनाचे विश्व नीट समजावून घ्यायला हवे. दर शेतकरी कुटुंबामागे असणारी अत्यल्प जमीनधारणा, बहुविध पीकपद्धतीचा अभाव, स्वल्प सिंचन, नागरीकरणाची कमी असणारी पातळी आणि शेतीवर असणारे सघन अवलंबन... अशी सगळी परिस्थिती असल्यामुळे जेमतेम घरच्यापुरतेच पिकवणा-या बहुसंख्य शेतकरी वर्गाच्या लेखी गोधन तसे फारसे महत्त्वाचे ठरत नाही. त्यांतच, भरीस भर म्हणून की काय, ओडिशामध्ये गोवंशबंदीचा अंमल व्यवहारात जारी करण्यात आलेला आहे. असे असूनही बांगला देशामध्ये केल्या जाणा-या गोधनाच्या बेकायदेशीर निर्यातीमुळे परिस्थिती अधिक खालावलेली नाही (आताशा, भारतामधून बांगला देशामध्ये केल्या जाणा-या गोधनाच्या चोरट्या निर्यातीस आळा घालण्याच्या दृष्टीने भारत व बांगला देशादरम्यानच्या सीमावर्ती प्रदेशात भारतीय सैन्यदलांनी पावले उचलल्यामुळे निर्यातीमध्ये बव्हंशी घट झाल्याचे अनुभवास येते. परिणामी, बांगला देशातील बाजारपेठांमधील गोधनाच्या किंमतींमध्ये एकदम तेजी आलेली दिसते. तसेच, तिथून केली जाणारी गोधनजन्य जिनसांची निर्यातही रोडावलेलीच आहे). या चित्राशी पूर्णपणे विसंगत असे चित्र तामिळनाडूमध्ये दिसते. अतिशय वेगाने होणारे नागरीकरण, विकसित असे सघन सिंचनाचे जाळे आणि रोजगारासाठी शेतीवर असलेल्या अवलंबनामध्ये वेगाने होणारी घसरण, हे तामिळनाडूमधील वास्तव होय. परिणामी, अधिक दुधाळ असणारे

संकरित गोधन हाच इथून पुढच्या काळात तामिळनाडूतील दुग्धोत्पादनाचा कणा बनेल असे चित्र आता तिथे हळूहळू उभरताना दिसते.

चांगल्यापैकी दुधाळ अशा देशी गाईंच्याबाबतीत गुजरातमध्ये ब-यापैकी आशादायक परिस्थिती दृष्टीस पडते. असे असूनही, संकरित गोधनाचे एकंदर गोधनामधील प्रमाण सतत वाढतानाच दिसते. भविष्यातही तिथे हाच कल दिसावा. देशी वाणाच्या गोधनाचे महत्त्व उतरणीस लागण्यास अधिक काळ जावा लागेल, अशी चिन्हे आजघडीला दिसतात. बैलांच्या हत्येवर बंदी घातली गेली तर देशी तसेच विदेशी गाईंच्या संख्येत आणि पर्यायाने दुधाच्या उत्पादनामध्ये आगामी भविष्यकाळात वाढ घडून येणे दुष्करच भासते.

गोधनातील बदलांचे देशपातळीवर जे सरासरी चित्र दिसते त्याचेच प्रतिबिंब महाराष्ट्रामध्ये पडलेले आहे. सद्यःस्थितीला बाधा उत्पन्न करणारी काही परिस्थिती उद्भवली नाही तर भविष्यात महाराष्ट्राची वाटचाल गोधनाच्याबाबतीत तामिळनाडूच्या दिशेने व्हावी. परंतु, सध्याप्रमाणे सर्व प्रकारच्या गोधनाच्या हत्येस आणि गोमांसाच्या विक्रीवर बंदी कायम राहिली तर मात्र महाराष्ट्राचे चित्र क्रमाने ओडिशातील चित्राप्रमाणे दिसू लागेल. किंबहुना, ओडिशापेक्षाही महाराष्ट्रातील वास्तव अधिक भीषण बनेल, असे वाटल्यावाचून राहत नाही. गाईबैलांच्या विक्रीस संपूर्ण पाबंदीच असेल तर शेतकरी करतील तरी काय ? निरुपयोगी, भाकड बनल्याने त्यांचे पालन-संगोपन परवडणे शेतक-यांना अशक्य बनलेले सारे गोधन चाराछावण्यांमधून सांभाळणे सरकारला शक्य होणार आहे काय ? हत्येवरती बंदी जारी राहिल्याने अशा गोधनाची संख्या येत्या काळात फुगतच राहील. दुष्काळी परिस्थिती उद्भवल्यानंतर त्या मानाने मर्यादित मात्रेने असणारे गोधन चाराछावण्यांद्वारे तगवून धरतानाच आजमितीस सरकारची होत असलेली धावपळ आपण सगळे बघत असतोच. सांभाळ अशक्य बनल्याने शेतक-यांनी सोडून दिलेले असे गोधन उद्या केवळ खेडोपाडीच नव्हे तर शहरोशहरीही मोकाट भटकायला लागल्याने शेतीबरोबरच एकंदर नागरी जीवनाच्याच सुरक्षाव्यवस्थेपुढे केवढे बिकट आव्हान उभे राहील, याची कल्पना तरी आपल्यापैकी कोणाला आहे काय ?



देशी वाणाच्या दुभत्या गोधनाची आपल्या देशातील संख्या इथून पुढच्या काळात वाढती राहण्याची चिन्हे एकंदरीने अवघडच भासतात. गुजरातमधील गीर आणि आंध्र प्रदेशातील अंगोल वाणाच्या गोधनाची आयात ब-याच वर्षापूर्वी ब्राझीलने केली होती. गीर आणि अंगोल या दोन वाणांची चांगली गुणवान जनावरे वेगळी निवडून त्यांच्या अतिशय पद्धतशीरपणे केलेल्या वंशवृद्धीद्वारे विलक्षण दुधाळ अशी गीर वाणाच्या गाईंची प्रजाती आणि उच्च दर्जाचे गोमांस देणा-या अंगोल वाणाची निपज ब्राझीलने मोठ्या परिश्रमपूर्वक साध्य केलेली आहे. या दोन्ही जिनसांची निर्यातही ब्राझीलमधून केली जाते. परंतु, आपल्या देशातील स्थानिक गोधनाची गुणवत्ता उंचावण्याच्या दृष्टीने आजवर आपण कोणतेही प्रयत्न केलेले नाहीत. काही देशी वाणांच्याबाबतीत अगदी अलीकडे काही प्रयोग सुरू झाल्याचे दिसते. मात्र, गोवंशहत्याबंदीसारखी पावले उचलली जाण्याने अशा प्रयोगांची मृत्युघंटा घणघणायला लागेल, असे म्हणण्यावाचून पर्याय नाही. परिणामी, आपल्या देशातील देशी तसेच संकरित गोधन यथावकाश लयाला जाईल.

गोवंशाच्या हत्येवरील बंदीच्या मागे असणारी कारणमीमांसा सर्वविदित आहे. 'पवित्र गोधना'ला भेडसावणा-या (हत्येच्या) संभाव्य अरिष्टाबाबत देशभरातील हिंदुधर्मीयांपैकी एक मोठा गट सततच सचिंत राहत आलेला दिसतो. गोवधबंदीच्या तरतुदीचा समावेश घटनेमध्ये केला जावा, असा आग्रह काँग्रेससह अन्य पक्षांतील खासदारांच्या एका प्रभावी गटाने घटनासमितीमध्ये सातत्याने लावून धरला होता तो त्यांमुळेच. परंतु, या गटाच्या मागणीला होणारा विरोधही तेव्हा तितकाच तीव्र व ताकदवान होता. परिणामी, गोहत्येला बंदी घालण्याबाबतची तरतूद घटनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये अंतर्भूत केली जाण्याचा मध्यम मार्ग तडजोडीखातर मग स्वीकारला गेला. मूलभूत हक्कांच्या धर्तीवर घटनेतील मार्गदर्शक तत्त्वे ही बंधनकारक असत नाही, ही बाब या संदर्भात अधोरेखित करावयास हवी.

गोहत्येस प्रतिबंध करणारा कायदा अस्तित्त्वात आणला जावा या साठी राजकीय नेतृत्त्वाच्या एका गटाने तसेच काही हिंदुधर्माच्या काही समर्थकांनी स्वातंत्र्यानंतर, या तरतुदीचा आधार घेत, दबाव निर्माण

करण्यास सुरुवात केली. या मागणीचा पाठपुरावा करण्यासाठी जगन्नाथपुरीतील गोवर्धन मठाच्या शंकराचार्यांनी १९६६ सालातील नोव्हेंबर महिन्यात उपोषणही (सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंतचेच ?) आरंभले. हिंदुत्ववादी विचाराची पाठराखण करणा-या राजकीय पक्षाची सत्ता आता केंद्रासह देशातील काही राज्यांमध्ये आल्यानंतर आज ५० वर्षांनी त्याच मागणीचे पुनरुज्जीवन पुन्हा एकवार केले जात असल्याचे वास्तव आपण सगळेच अनुभवतो आहोत. गोवंशहत्येवरील निर्बंध आणि गोमांसाची साठवणूक व व्यापार यांवर महाराष्ट्र सरकारने अलीकडे जारी केलेली बंदी हा सगळा त्याचाच परिपाक होय.

गाय हा हिंदुधर्मीयांच्या लेखी पूज्य पशू होय, हिंदू लोक तिला गोमाता मानून तिची आराधना करतात आणि गाईचे दूध, शेण, गोमुत्र यांसारखे जिन्नस धार्मिक कृत्यांमध्ये वापरले जात असल्याने गोहत्याबंदी जारी करण्यात यावी, ही पूर्वापार चालत आलेली कारणमीमांसाच आता नव्याने केल्या जात असलेल्या मागणीच्या मुळाशी आहे. हिंदु पुराणांमध्ये निर्देश असलेले ३३ कोटी देव गाईच्या शरीरात वस्तीस असतात, अशी हिंदुधर्मीयांची धारणा आहे. गाईच्या शरीरात हे ३३ कोटी देव कसे आणि किती दाटीवाटीने सामावलेले असले पाहिजेत यांबाबत विनायक दामोदर सावरकर यांनी केलेली मोठी मार्मिक टिप्पण्णी या संदर्भात वाचण्याजोगी आहे - *"विष्णू, ब्रह्मा, शंख, चंद्र, सूर्य, सोम, यम प्रभृती झाडून सा-या देवांची तिच्या शरीरात एकच दाटी झालेली. कोणी डोळ्यांत, कोणी दातांवर, ज्याला जिथे साधले तिथे तो लगटला. पाठीच्या कण्यात तर, मधल्या सुटीत शाळेतील उनाड पोरे एखाद्या बाकावर गमतीने करतात तशी, देवांच्या दाटीची इतकी रेटारेटी चाललेली आहे की, वाळत घातलेले स्वतःचे गहूच खाताना त्या गाईला पाहून गोभक्तदेखील जेव्हा एखादे लाकूड तिच्या पाठीत घालतो तेव्हा दहापाच तरी लंबे झाल्यावाचून राहूच नयेत ! वर ही गर्दी झालेली पाहून कुल पर्वत खालूनच तिच्या पायात घुसले. नाग पुच्छात, महर्षी केसाकेसांच्या भोकात ! 'पुच्छे नागाः खुराग्रेषु ये चाष्टौ कुलपर्वताः । मध्ये देवगणाः सर्वे लोमकूपे महर्षयः' ! पण सगळ्यांत अत्यंत केविलवाणी दशा झाली त्या बिचा-या मरुताची नि वरुणाची ! Bone for the latecomers या न्यायाने उरलेल्या ज्या दोन जागीच शक्य त्या समाधानात राहण्याची पाळी आली त्यांजवर. त्या दोन जागा म्हणजे 'अपाने तु मरुद्देवो योनौच वरुणः स्थितः' ! आणि 'मूत्रे गंगा' ! ! !"* (संदर्भ : गाय - एक पशू, देवता तर नव्हेच नव्हे ! : *सावरकरांचे सामाजिक विचार*, संकलन - प्रा. विद्याधर पुंडलीक, मॅजेस्टिक प्रकाशन, जानेवारी १९७३).



अंतिमतः, पवित्र अशा गोमातेचे दर्शन खेडोपाडी दुर्लभ व दुर्मीळ होण्यामध्ये या सगळ्याची परिणती संभवते. येत्या काळात तोच धोका दिसतो. गोभक्तांना आराधना करता यावी व गोमय मिळावे केवळ याचसाठी देवळांमधून गाईंचा सांभाळ पुढच्या काळात केला गेला तर त्याचे आश्चर्य वाटावयास नको. प्राचीन काळातील ज्यू धर्मीय लोक गाईची सोन्याची मूर्ती निर्माण करून तिची उपासना करत असत. तसेच काही तरी आपल्या देशातही संभवते. देशी वाणाच्या गोधनाची गुणवत्ता लक्षणीयरीत्या उंचावण्याबाबत त्वरेने काही पावले उचलली गेली नाहीत तर या पेक्षा निराळे चित्र दिसण्याची आशाच नको. देशी गोधनाची गुणवत्ता उंचावण्यासाठी जरी भले काही पावले एकीकडे उचलली गेली तरी दुसरीकडे गोवंशहत्याबंदी जारी राहिली तर सगळ्यावरच पाणी पडेल. मग, दस्तुरखुद्द देवाधिदेवही पवित्र अशा गोमातेचे रक्षण करूशकणार नाही ! ■■

(**टीपः** गोधनासंदर्भातील या लेखात नमूद करण्यात आलेली सर्व आकडेवारी २००७ व २०१२ या दोन वर्षी आपल्या देशात सर्वत्र आयोजित करण्यात आलेल्या अनुक्रमे १८व्या व १९व्या पशुधन गणनेद्वारे उपलब्ध झालेल्या माहितीमधून घेतलेली आहे. तर, देशभरातील लहान शेतक-यांच्या सरासरी जमीनधारणाबाबतची सांख्यिकी अगदी अलीकडील वर्षासाठी उपलब्ध असलेल्या कृषी गणनेमधून घेतलेली आहे. भारतामधून बांगला देशामध्ये केल्या जाणा-या गोधनाच्या चोरट्या व्यापारासंदर्भातील तपशील तारीख ४ जून २०१५ रोजीच्या दैनिक 'हिंदू'मध्ये प्रकाशित झालेल्या मजकुरावर बेतलेला आहे. सर्वश्री चंदा निंबकर, शरदिनी रथ, तपन मिश्र आणि सत्यजित रथ यांनी प्रस्तुत लेख वाचून त्याबाबत काही सूचना केल्या त्यांबद्दल त्यांचे आभार). ■■

सांस्कृतिक

# शब्द आणि शब्दांच्या अलीकडले....

काही वर्षांपूर्वी ‘भाषा का शिकायची ? ’ या प्रश्नाचे उत्तर, ‘ती संवाद साधण्याचे माध्यम आहे म्हणून’, असे साधे आणि सरळ होते. पण गेल्या काही वर्षांतील मेंदूसंशोधनाने भाषेचे स्वरु प, आकलन याविषयीचे अनेक पैलू प्रकाशात आणले आणि ती निव्वळ संवाद साधण्याचे साधन न राहता विचार, भावना, व्यक्तिमत्व यांच्या प्रकटीकरणाचे जिवंत माध्यम म्हणून समोर आली.

भाषेचा आविष्कार शब्दांतून होतो. तेच खरे भाववाहक असतात. अचूक आणि अर्थवाही शब्दांतून प्रकट होणारी भाषा हा खरा तर एक चमत्कारच म्हणायला हवा. भाषेतील शब्दांचा हा खेळ आपण पदोपदी खेळत असतो, मात्र त्या विषयी पूर्ण अनभिज्ञ असतो. भाषेची, भाषेतील शब्दांची ही महती बघून इतर अनेक विषयांतील तज्ज्ञ आता भाषेच्या अभ्यासाकडे वळत आहेत. त्यांच्या अभ्यासातून, संशोधनातून मिळणारे निष्कर्ष भाषेविषयीच्या आपल्या आजवरच्या समजांना धक्का देणार आहेत. पण त्याबरोबरच ते रोचक आणि उद्‌बोधकही आहेत.

James Pennebaker हे अमेरिकेतील एक प्रसिध्द सामाजिक मानसशास्त्रज्ञ. त्यांनाही हा ‘शब्दच्छला’चा नाद अनपेक्षितपणेच लागला. १९८० च्या सुमारास Pennebaker आपल्या विद्यार्थ्यांसमवेत काही मानसिक रुग्णांवर प्रयोग करत होते. या रुग्णांच्या मनातील भावनिक उलथापालथीला वाट मोकळी करून द्यावी या उद्देशाने Pennebaker यांनी त्यांना आपले अनुभव शब्दबध्द करण्यास सांगितले. त्यांनी लिहिलेले हे अनुभव वाचत असताना Pennebaker यांच्या लक्षात आले की, आपले दुःखद, क्लेशकारक अनुभव लिहून काढल्यानंतर या रु ग्णांचा त्या अनुभवांकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलतो आहे. अधिक विधायक होतो आहे. त्यांना प्रश्न पडला की, या लिखाणात अशी काय जादू आहे ज्यामुळे या रु ग्णांच्या विचारात इतका आमूलाग्र फरक पडला. त्यांनी आणि त्यांच्या सहका-यांनी या



प्रश्नाचा पाठपुरावा करण्याचे ठरवले. त्यासाठी अशाच अनुभवांवर आधारीत लिखाणाचे असंख्य नमुने त्यांनी गोळा केले. त्यांचे विश्लेषण करण्यासाठी, अभ्यास करण्यासाठी आणि त्यातून खरोखरच मानसिक रोगावर इलाज करता येण्याजोगी काही वेगळी लेखनपध्दती आहे का, याचा शोध घेण्यासाठी नवी संगणकप्रणाली विकसित केली. या सर्व अभ्यासातून Pennebaker आणि त्यांच्या सहका-यांना मिळालेल्या निष्कर्षांनी त्यांच्यासाठी संशोधनाचे नवीन दालनच खुले केले.

Pennebaker यांच्या लक्षात आले की, विचारांना वेगळे वळण देणा-या लिखाणातील सामर्थ्य हे त्या लिखाणाच्या आशयात नाही तर त्याच्या शैलीत दडले आहे. आपल्या अनुभवांविषयी पहिल्यांदा लिहिल्यावर त्याच अनुभवांविषयी दुस-यांदा, तिस-यांदा लिहिताना माणसांचे विचार जसजसे बदलत गेले, तसतसा त्यांच्या लिखाणातील सर्वनामांमध्ये बदल होत गेला. सुरु वातीला प्रथमपुरु षी एकवचनी सर्वनामे वापरणारे लोक कालांतराने द्वितीयपुरु षी आणि तृतीयपुरु षी सर्वनामे वापरू लागले आणि त्यांच्या विचारात बदल होऊ लागला. जणू काही या लोकांच्या जाणिवेच्या कक्षेबाहेर सर्वनामांचे एक अज्ञात विश्व होते आणि त्या शब्दांतून त्यांची मानसिक अवस्था प्रतीत होत होती.

Pennebaker म्हणतात “ती एका महत्त्वपूर्ण शोधाची नांदी होती. त्या नंतर मी जे मिळेल त्या लिखाणाचा अभ्यास करू लागलो. ब्लॉग, ई-मेल, भाषणे, विद्यार्थ्यांचे निबंध, नैसर्गिक संभाषण यातील भाषेवर चिंतन करू लागलो. उल्लेखनीय गोष्ट अशी की, यातील शब्दांचा वापर हा मी अभ्यासलेल्या सामाजिक मानसशास्त्राच्या बहुतेक सर्व पैलूंशी निगडीत होता. मला कळून चुकले की, भाषेची शैली जाणून घेतली तर आपल्याला आपल्या वर्तनावर परिणाम करणा-या सामाजिक आणि मानसशास्त्रीय प्रक्रियांचे स्वच्छ आकलन होईल.’’

Pennebaker यांची शब्दांशी असलेली मैत्री जसजशी अधिक दृढ होत गेली, तसतसे त्यांना शैलीचे मर्म उमगू लागले. त्यांना दिसून आले की, विशिष्ट शब्दांच्या वापरातून केवळ लिंगभेदच नाही तर लोकांचे वय, सामाजिक स्तर, भावनिक स्तर, प्रामाणिकपणा, व्यक्तिमत्व,

अनौपचारिकता, नेतृत्वक्षमता, परस्परांतील नातेसंबंधांचे स्वरूप हे सर्व जाणून घेता येते.

Pennebaker यांना अपेक्षित असलेली ही शैली नेमकी काय होती? ते म्हणतात की, कुठलेही वाक्य हे दोन प्रकारच्या शब्दांनी बनलेले असते. पहिल्या प्रकारच्या शब्दांना Content words म्हणतात आणि दुस-या प्रकारच्या शब्दांना Function words म्हणतात. Content words ना स्वतःचा अंगभूत अर्थ असतो. त्यामुळे हे शब्द डोळ्यांसमोर त्यांची प्रतिमा उभी करतात. उदाहरणार्थ, नाम (Noun), क्रियापद (Verb), विशेषण (Adjective) आणि क्रियाविशेषण (Adverb). Function words ना मात्र स्वतःचा अंगभूत अर्थ नसतो. Content words ना वाक्यात योग्य रितीने गुंफून वाक्य अर्थपूर्ण बनवण्याचे काम हे Function words करतात. उदाहरणार्थ, सर्वनामे (Pronouns), उपपदे (Articles), शब्दयोगी अव्यये (Prepositions). साहाय्यकारी क्रियापदे (Auxillary verbs), नकारार्थी शब्द (Negations), उभयान्वयी अव्यये (Conjunctions), परिमाणदर्शक शब्द (Quantifiers), सामान्य क्रियाविशेषणे (Common Adverbs) इत्यादी.

आजवर भाषेचा विचार करताना आपण फक्त या Content words नाच महत्त्व देत आलो. Function words ची मात्र फारशी दखल घेतली नाही. संभाषणातील काय, कोण, कुठे या प्रश्नांची उत्तरे Content words देतात म्हणून असेल कदाचित, पण Function words कायम दुर्लक्षित राहिले. Pennebaker यांनी जेव्हा भाषेच्या विविध नमुन्यांचा अभ्यास केला, तेव्हा त्यांना दिसून आले की, माणसे मनाच्या गाभ्यातून व्यक्त होतात, तेव्हा ते Function words चा जास्त वापर करतात. त्यामुळे एखाद्या व्यक्तीची भावावस्था, व्यक्तिमत्व समजून घ्यायचे असेल तर Function words चा अभ्यास उपयोगी पडतो. Function words छोटे असतात, सहजी जाणवणारे नसतात. कारण मेंदूमध्ये त्यांच्यावर होणारी प्रक्रिया ही Content words वर होणा-या प्रक्रियेपेक्षा वेगळ्या प्रकारची असते. एखादा महत्त्वपूर्ण विचार Function words च्या साहाय्याने कसा प्रभावीपणे व्यक्त होतो याचे उदाहरण म्हणून Pennebaker यांनी त्यांच्या एका लेखात अब्राहम लिंकन यांच्या एका भाषणाचा संदर्भ दिला आहे.



१८८३ सालच्या नोव्हेंबर महिन्यात Gettysberg ची लढाई संपल्यावर चारच महिन्यांनी अब्राहम लिंकन यांनी अमेरिकेच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण असे हे भाषण दिले. ते म्हणतातः

*"Four score and seven years ago our fathers brought forth, upon this continent, a new nation, conceived in Liberty, and dedicated to the proposition that all men are created equal.*

*Now we are engaged in a great civil war, testing whether that nation, or any nation so conceived, and so dedicated, can long endure. We are met here on a great battlefield of that war. We have come to dedicate a portion of it as a final resting place for those who here gave their lives that that nation might live. It is altogether fitting and proper that we should do this.*

*But in a larger sense we can not dedicate - we can not consecrate - we can not hollow this ground. The brave men, living and dead, who struggled, here, have consecrated it far above our poor power to add or detract. The world will little note, nor long remember, what we say here, but can never forget what they did here.*

*It is for us, the living, rather to be dedicated here to the unfinished work which they have, thus for, so nobly carried on. It is rather for us to be here dedicated to the great task remaining before us- that from these honored dead we take increased devotion to that cause for which they here gave the last full measure of devotion - that we here highly resolve that these dead shall not have died in vain, that this nation shall have a new birth of freedom; and that this government of the people, by the people, for the people, shall not perish from the earth".*

हे भाषण ऐकल्यानंतर त्यातील nation, war, men आणि dead असे मोजके Content wordsच आपल्या लक्षात राहतात. पण, भाषण जर बारकाईने नीट वाचले तर लक्षात येईल की, या भाषणात सर्वाधिक वेळा

वापरला गेलेला शब्द that हा आहे. जे शब्द भाषणात जास्त वेळा वापरले गेले त्या पहिल्या १५ शब्दांमध्ये केवळ nation हा एकच शब्द Content word आहे. इतिहासातील एवढे महत्त्वपूर्ण भाषण आणि तेही अशा छोट्या, नगण्य शब्दांनी बनलेले असावे, हा विरोधाभास नाही तर काय ?

Pennebaker म्हणतात की, कुठलेही भाषण किंवा लेखन हे असेच बिनमहत्त्वाच्या वाटणा-या Function words नी बनलेले असते. गेल्या २० वर्षांच्या काळात त्यांनी आणि त्यांच्या सहका-यांनी लिखाणात आणि भाषणात जे शब्द जास्तीत जास्त वेळा वापरले गेले त्यांची यादी बनवली आहे. या यादीतील पहिले २० शब्द हे Function words आहेत.

इंग्रजी बोलणा-या सर्वसामान्य माणसाकडे साधारणपणे एक लाख शब्दांचा संग्रह असतो. या शब्दांपैकी ९९ टक्क्यांपेक्षा अधिक शब्द हे Content words असतात. तर, उरलेले एक टक्क्याहून कमी शब्द हे Function words असतात. परंतु, प्रत्यक्ष लेखनात अथवा बोलण्यात मात्र Function words चे प्रमाण ५५ टक्के आणि Content words चे प्रमाण ४५ टक्के असे असल्याचे सरासरीने दिसते. शब्दांची ही अशी विभागणी केवळ इंग्रजी भाषेमध्येच नाही तर इतरही भाषांमध्ये अशाच प्रकारची असल्याचे सर्वसाधारणपणे आढळून येते.

Function words चा वापर माणसे कसा करतात त्यांवरून त्या माणसांच्या स्वभावाविषयी. व्यक्तिमत्त्वविशेषांविषयी, सवयींविषयी ब-याच गोष्टी सांगता येतात. उदाहरणच घ्यावयाचे झाले तर, काही माणसे उपपदांचा वापर मोठ्या प्रमाणावर करतात; तर, काही जण अपवादानेच उपपदे वापरतात. स्त्रियांच्या तुलनेत पुरूष उपपदांचा वापर सरासरीने अधिक करतात. पण तरीही लिंगभेद बाजूला ठेवून असे म्हणता येईल की, जे उपपदांचा वापर अधिक प्रमाणात करतात ते तुलनेने अधिक शिस्तप्रिय असतात. मानसिकदृष्ट्याही अशा व्यक्ती अधिक स्थिर, परंपरावादी आणि बहुतेकदा वयस्कर असतात. पुरूष आणि स्त्रिया यांच्या शब्दांच्या निवडीतही फरक असल्याचे सर्वसाधारणपणे आढळून येते. 'मी', 'माझे', 'मला' यांसारखी प्रथमपुरुषी सर्वनामे पुरुषांच्या तुलनेत स्त्रिया अधिक वापरताना दिसतात. लोक विचार कसे करत असतात, आजुबाजूची माणसे, परिसर



ते कसे जाणून घेतात यांबाबत सर्वनामे आपल्याला बरेच काही सांगत असतात. अनौपचारिक शैली असणारी माणसे सरळ, फारशी विनोदबुद्धी नसलेली आणि क्वचितप्रसंगी अहंकारी असतात. ही माणसे आपल्या लेखनात उपपदे आणि शब्दयोगी अव्ययांचा वापर अधिक प्रमाणात करतात. तर, 'मी'सारख्या प्रथमपुरुषी पदांचा वापर तुलनेने कमी करतात. वर्णनात्मक शैली असणारी माणसे नैसर्गिक कथाकथनकार असतात. त्यांच्या लेखनात क्रियापदांचे भूतकाळ, with, together यांसारखे सर्वसमावेशक शब्द (inclusive words) अधिक प्रमाणात असतात. थोडक्यात काय तर, Function wordsच्या वापराचे वेगवेगळे आकृतिबंध (patterns) हे माणसाच्या व्यक्तिमत्त्वातील महत्त्वपूर्ण भागाचे दर्शन घडवत असतात.

Pennebaker यांच्या या शब्दांच्या विश्लेषण तंत्राचा वापर निरनिराळ्या क्षेत्रांत होत आहे. इतिहासकार आणि चरित्रकार यांच्यासाठी तर ही पद्धत अधिकच उपयुक्त आहे. ते म्हणतात की, लेखनाचे विश्लेषण करण्याच्या या नवीन पद्धतीमुळे, गेल्या शेकडो वर्षांत जे उदंड लेखन केले गेले त्याचा अभ्यास करणे शक्य झाले आहे. जगावर परिणाम करणा-या घटनांमुळे माणसाची विचार करण्याची पद्धत, भावना व्यक्त करण्याची पद्धती, सामाजिक नातेसंबंध यांत आमूलाग्र बदल झालेला आहे का, यांबाबतचे निष्कर्ष या अभ्यासाद्वारे मिळू शकतील. Pennebaker यांनी स्वतः १६व्या शतकातील कवींचा, नाटककारांचा आणि कादंबरीकारांच्या साहित्याचा अभ्यास केलेला आहे. ते जसजसे वयस्कर होत गेले तसतसे त्यांच्या शैलीत कोणकोणते बदल होत गेले याचे निष्कर्षही त्यांनी नोंदवले आहेत. आत्महत्या केलेले इंग्रजी साहित्यातील कवी आणि आत्मघात न केलेले कवी यांच्यादरम्यान सर्वनामांच्या वापरासंदर्भात असलेल्या फरकाचाही त्यांनी अभ्यास केलेला आहे. भाषेच्या शैलीच्या अभ्यासाने लेखकाच्या मनाचा शोध घेणे शक्य झाले आहे. इंग्रजी साहित्यविश्वातील Elizabeth Barret आणि Robert Browning या दंपतीच्या कवितेचा अभ्यास आणि त्यांच्या विवाहाचा इतिहास यांचा तुलनात्मक अभ्यास त्यांनी केला आहे. ते म्हणतात की, Language Style Matching या तंत्राचा अवलंब करून पतिपत्नींमधील बदल आपल्याला जाणून घेता येतात. ***(पृष्ठ ३२ पाहावे)***

# परंपरेच्या ‘बखरी’

हळदीच्या आणि कडुनिंबाच्या वापरावर निर्बंध येणार ही वार्ता १९९०च्या दशकाच्या उत्तरार्धात कानावर आली आणि प्रत्येक भारतीयाचे धाबे दणाणले. आजवर केवळ आहारातच नाही तर औषधी उपचारांपासून इतरही अनेक गोष्टींसाठी वापरली जाणारी हळद आणि कडुनिंब आता राजरोसपणे वापरता येणार नाही, हा विचारच प्रत्येक भारतीयाला अस्वस्थ करत होता. एखाद्या गोष्टीचे पेटंट घेणे म्हणजे काय आणि त्याचा परिणाम काय होऊ  शकतो हे भारतीयांना त्या वेळी ख-या अर्थाने कळले. हळद आणि कडुनिंब यांचे औषधी गुणधर्म आपल्या समाजाला पूर्वापार ठाऊ क आहेत. तो आपल्या पारंपरिक ज्ञानाचा भाग आहे. या ज्ञानाचा मालकीहक्क विकत घेऊ न कुणी त्यांच्या वापरावर निर्बंध घालू शकते, अशी कल्पनाच आपण कधी केली नव्हती. पण हे घडले आणि केवळ भारतीयांनाच नाही तर ज्या देशांमध्ये अशा पूर्वापार चालत आलेल्या ज्ञानाचा खजिना आहे, त्या सर्वच देशांना एक धडा मिळाला. आपल्या पारंपरिक ज्ञानावर कुणी मालकीहक्क सांगू नये म्हणून सगळेच जागरू क झाले आणि या ज्ञानाचे जतन कसे करता येईल याचा विचार करू लागले.

पारंपरिक ज्ञान हे समाजाच्या विचारमंथनातून, अनुभवातून संकलित झालेले ज्ञान असते. एखाद्या प्रदेशात राहणा-या लोकसमूहाने ते आधीच्या पिढ्यांकडून प्राप्त केलेले असते. पारंपरिक ज्ञानाला सामूहिक ज्ञान, स्थानिक ज्ञान किंवा  ग्रामीण समाजाचे ज्ञान असेही म्हणतात. हे ज्ञान ब-याचदा कथा, लोककथा, गीते, म्हणी, दंतकथा, सांस्कृतिक मूल्ये, समजुती, रीतीरिवाज, सामुदायिक कायदे, स्थानिक भाषा या माध्यमांद्वारे लोकांच्या स्मरणात असते. पारंपरिक ज्ञान पर्यावरण, शेती, हवामान, शिक्षण, कलाकृतींमधील कौशल्य, आरोग्य, बांधकामाचे तंत्र, वैद्यक असे कुठल्याही विषयातील ते असू शकते.



अशा ज्ञानाची फार मोठी परंपरा भारताला लाभली आहे. इथे निरनिराळ्या धर्माचे, वंशाचे लोक पूर्वापार राहात आले आहेत. येथील ग्रामीण समाजजीवनही विपुल आहे. आदिवासी समाज, महिला आणि इतर वंचित समाज यांचे प्रमाणही मोठे आहे. हे सर्व समाज गेली अनेक दशके आर्थिक, राजकीय आणि सामाजिक फायद्यांपासून वंचित आहेत. आपल्या चरितार्थासाठी, दैनंदिन व्यवहारांसाठी हे समाज त्या-त्या प्रदेशातील नैसर्गिक स्रोतांवरच अवलंबून आहेत. या स्रोतांचा वापर आणि नियोजन कसे करायचे याचे ज्ञान त्यांच्या आधीच्या पिढ्यांकडून त्यांच्यापर्यंत झिरपत आले आहे. या ज्ञानावर त्यामुळेच कुणा एका व्यक्तीचा मालकीहक्क नाही आणि जर असेल तर तो त्या पूर्ण समाजाचा आहे.

आजवर परंपरेने चालत आलेले हे ज्ञान फक्त त्या समाजापुरतेच किंवा त्या प्रदेशापुरतेच मर्यादित होते. पण अलीकडच्या काळात माणसाने आपल्या हव्यासापायी निसर्गालाच ओरबाडायला सुरु वात केली आणि त्याचे लक्ष  आजवर या त्याच्या माहितीच्या परिघाबाहेर असलेल्या पारंपरिक ज्ञानाने वेधून घेतले. आज तो त्यावर मालकीहक्क प्रस्थापित करू पाहतो आहे. पण त्याची ही कृती वंचित समाजघटकांचे नुकसान करणारी तर आहेच शिवाय ती पारंपरिक ज्ञान ज्या नैसर्गिक स्रोतांवर अवलंबून आहे, त्या स्रोतांचेही नुकसान करणारी आहे. बदलणारे नैसर्गिक पर्यावरण, वेगाने होणारे शहरीकरण, तंत्रज्ञानाचे आक्रमण, काही प्रमाणात भाषेची समस्या या घटकांमुळेही पारंपरिक ज्ञानाच्या अस्तित्वावर गदा आली आहे.

जगातील अनेक देशांतील, खास करू न विकसनशील देशांतील, बहुतांश लोकांच्या जीवनात पारंपरिक ज्ञानाला महत्त्वाचे स्थान आहे. भारतात तर ७०-८० टक्के लोकजीवन प्राथमिक आरोग्य उपचारांसाठी पारंपरिक वैद्यकीय ज्ञानावर अवलंबून आहे. पारंपरिक ज्ञान टिकून राहायला हवे याचे महत्त्वाचे कारण म्हणजे ते नैसर्गिक आणि जैविक स्रोतांवर अवलंबून आहे. त्यामुळे हे ज्ञान टिकले तर नैसर्गिक स्रोत आपोआपच टिकून राहणार आहेत. त्या अर्थाने पारंपरिक ज्ञान हे सातत्यशील विकासाला हातभार लावणारे आहे. पारंपरिक ज्ञानात नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर होत असल्याने ते कमी खर्चिक आणि सर्वसामान्यांना परवडणारे आहे.

पारंपरिक ज्ञान हा नंतरच्या आधुनिक ज्ञान, विज्ञानाचा पाया मानला तर त्या आधारावर आधुनिक तंत्रज्ञान आणि नवीन संशोधन प्रकल्पांची बांधणी आपल्याला करता येईल. ती फार खर्चिकही नसेल आणि त्यातून सातत्यशील विकास साधणेही शक्य होईल. पारंपरिक ज्ञानातून होणारा नेमका हाच फायदा कॉर्पोरेट आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांना खुणावतो आहे. सध्या बौध्दिक संपत्तीच्या वारसाहक्कांना फार महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे या पारंपरिक ज्ञानाच्या संपत्तीलाही धोका निर्माण झाला आहे. स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी या ज्ञानाचा गैरवापर करणा-यांची संख्या मोठी आहे. त्यामुळे उद्या हे ज्ञान जर अशा मंडळींच्या हातात पडले तर ही मंडळी या ज्ञानावर अवलंबून असलेल्या सर्व समाजघटकांना वेठीला धरायलाही मागे पुढे पाहणार नाहीत. या समूहांच्या अस्तित्वावरच त्यामुळे गदा येणार आहे. हे समूह टिकले नाहीत तर त्यांचे सांस्कृतिक रीतीरिवाजही टिकणार नाहीत. त्यामुळे अशा आर्थिक लाभासाठी धडपडणा-या मंडळींच्या कचाट्यातून या ज्ञानाची सुटका करायची असेल तर त्याचे व्यवस्थित जतन आणि त्यावर चुकीच्या पध्दतीने कुणी मालकी हक्क प्रस्थापित करू नये म्हणून योग्य दस्तऐवजीकरण करणे गरजेचे आहे.

संयुक्त राष्ट्रांचा १९९० मधील एक अहवाल सांगतो की, आजवर पारंपरिक ज्ञानावर आधारलेली १३० पेटंट दिली गेली. ही सर्व पेटंट औषधी गुणधर्म असलेल्या वनस्पतींची होती. या पेटंटमुळे त्या वनस्पतींवर उपचारांसाठी अवलंबून असलेल्या समूहांचे फार मोठे नुकसान झाले आहे. त्यातही त्यांचे सांस्कृतिकदृष्टया झालेले नुकसान जास्त गंभीर आहे.

पारंपरिक ज्ञान हे एका पिढीकडून दुस-या पिढीकडे हस्तांतरीत होत असल्यामुळे त्यावर कुणा एका व्यक्तीचा नाही तर समूहाचा हक्क असतो. या ज्ञानाचे मालकीहक्क कुणा एका व्यक्तीकडे सुपूर्द करता येत नाहीत. त्यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्या किंवा अन्य संस्थांना त्यांचे मालकीहक्क सरळ मार्गाने मिळत नाहीत. अशा वेळी, पारंपरिक ज्ञान वापरून जे उत्पादन तयार केले जाते, त्या उत्पादनात किंचित बदल करून ती वस्तू नव्या रूपात या कंपन्या बाजारात आणतात आणि ती नव्याने उत्पादित केलेली वस्तू आहे असे सांगून त्यावर मालकीचा दावा दाखल करतात.



ज्या लोकांनी ती वस्तू बनवण्यासाठी लागणारे ज्ञान, कौशल्य अनेक वर्षांच्या अनुभवमंथनातून कमावले आहे, त्या लोकांना मात्र त्यापासून होणा-या आर्थिक फायद्यांपासून लांब ठेवले जाते. उलट, एकदा का एखाद्या वस्तूचे पेटंट दिले की, Individual Property Rights (IPR) ची व्यवसायविषयक धोरणे त्या ज्ञानावर अवलंबून असलेल्या देशांवर, तेथील नागरिकांवर त्या वस्तूच्या, ज्ञानाच्या वापरावर बंदी घालतात. त्या समूहाची त्या ज्ञानावरील मालकी संपुष्टात येते.

या सर्व गोष्टी टाळायच्या असतील तर पारंपरिक ज्ञानाला संरक्षण देण्याची आणि त्याचे जतन करण्याची नितांत आवश्यकता आहे. संरक्षण आणि जतन या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. पारंपरिक ज्ञान कोणते याची शहानिशा करून त्याचे दस्तऐवजीकरण करणे, त्याचे योग्य प्रकारे हस्तांतरण होते आहे की नाही याची काळजी घेणे, त्याचे पुनर्जीवन करणे, त्यातील सांस्कृतिक वारशाचा पुरस्कार करणे या सर्व गोष्टी जतनामध्ये येतात. तर या ज्ञानाचा गैरवापर होऊ नये, त्याची कुणी नक्कल करू नये किंवा त्याचा कुणी बेकायदेशीर वापर करू नये, हा भाग संरक्षणात येतो. पारंपरिक ज्ञानाचे संरक्षण दोन प्रकारे करता येते. एक म्हणजे विधायक संरक्षण आणि दुसरे बचावात्मक संरक्षण. पारंपरिक ज्ञानाच्या बेकायदा वापराला प्रतिबंध घालणे, ते अधिक ग्राहकाभिमुख करणे, त्याच्या कायदेशीर वापरासाठी देशपातळीवर कायदे करणे (उदाहरणार्थ, Sui Genesis) या सर्व गोष्टी विधायक संरक्षणात येतात. तर, या ज्ञानाच्या योग्य वापरासाठी धोरणे बनवणे, या ज्ञानावर कुणी मालकीहक्क प्रस्थापित करू नये म्हणून त्याच्या सविस्तर माहितीचे संकलन करून पुरावा म्हणून त्याचा वापर करणे या सर्व गोष्टी बचावात्मक संरक्षणाच्या अंतर्गत येतात.

पारंपरिक ज्ञान दोन स्वरूपांत असते. बरेचसे ज्ञान स्थानिक कथा, मिथके, काव्य, लोककथा, रीतीरिवाज यांच्या माध्यमातून मौखिक परंपरेने आपल्यापर्यंत पोचते; तर, प्राचीन ग्रंथ, जुने संदर्भ ग्रंथ, प्राचीन वाङ्मय यांच्यामध्ये लिखित नोंदींच्या रूपाने हे ज्ञान आढळते. या दोन्ही स्वरूपांतील ज्ञानाचे जतन करण्यासाठी त्याचे योग्य प्रकारे दस्तऐवजीकरण करण्याचे आव्हान आज विकसनशील देशांसमोर आहे.

गेल्या काही वर्षांत केवळ भारतातच नाही तर इतर अनेक विकसनशील देशांत पारंपरिक ज्ञानाच्या जतनाची आणि त्यासाठी आवश्यक असणा-या दस्तऐवजीकरणाची चळवळ मूळ धरू लागली आहे. प्रत्येक देश त्यावर वेगवेगळ्या पध्दतीने मार्ग काढत आहे, सोयीच्या पर्यायांची निवड करत आहे. त्याचीच ही काही प्रातिनिधिक उदाहरणे -

**१) पारंपरिक ज्ञानाचा डिजिटल संग्रह (Traditional Knowledge Digital Library- TKDL):**

भारत हा ख-या अर्थाने पारंपरिक ज्ञानाची खाण आहे. कडुनिंब आणि हळद यांच्या पेटंटच्या लढ्यातून शहाणे झाल्यानंतर भारतात पारंपरिक ज्ञानाचा डिजिटल संग्रह तयार करण्याचे काम वेगाने हाती घेण्यात आले. Council of Scientific and Industrial Research (CSIR) आणि Department of Ayurveda, Yoga and Naturopathy, Unani, Siddha and Homeopathy (AYUSH) या दोन संस्थांनी या कामी पुढाकार घेतला. या संग्रहात आयुर्वेद, सिध्द, युनानी, योग या प्राचीन उपचारपध्दतींचा समावेश आहे.

हा संग्रह डिजिटल रूपात आहे. प्राचीन ग्रंथ आणि इतर उपलब्ध साहित्य यांमधून मिळणारी भारतीय प्राचीन उपचारपध्दतींविषयीची माहिती या संग्रहात आहे. ज्या पुस्तकांतून ही माहिती घेतली आहे त्या पुस्तकाचा प्रकाशनकाळ, ठिकाण आणि त्याच्या भाषेचे माध्यम या संग्रहात नमूद केले आहे. आंतरराष्ट्रीय पेटंट कार्यालयातील पेटंट देणा-या अधिका-यांना समजणे सोयीचे जावे या उद्देशाने या संग्रहातील माहिती पाच परकीय भाषांमध्ये सादर करण्यात आलेली आहे.

या डिजिटल संग्रहामुळे, औषधी गुणधर्म असणा-या हळद, कडुनिंब यांसारख्या २ लाख ९० हजार वनस्पतींना त्यांचा गैरवापर करणा-यांपासून वाचवण्यात आपण यशस्वी झालो आहोत. त्यामुळे भारतीय उपचारपध्दतींवर पेटंट दाखल करण्याच्या प्रमाणात ४४ टक्क्यांनी घट झाली आहे. या संग्रहामुळे जगातील इतरही देश आता त्यांच्या पारंपरिक ज्ञानाच्या जतनासाठी सरसावले आहेत. आपल्या या डिजिटल संग्रहाला काही मर्यादा जरूर आहेत. या संग्रहात केवळ लिखित नोंदी असणा-या ज्ञानाचाच समावेश



आहे आणि यातील माहिती केवळ औषधनिर्माणशास्त्र आणि वैद्यकशास्त्र यांच्याशीच निगडीत आहे.

**२) Korean Traditional Knowledge Portal (KTKP) :**

Korean Intellectual Property Office ने तयार केलेल्या या माहिती संग्रहात मोठ्या प्रमाणात प्राचीन चिनी आणि कोरियन औषधांविषयी माहिती दिलेली आहे. या विषयाशी संबंधित बरेच लेख तसेच पेटंट विषयक माहितीही या संग्रहात आहे. एकंदर ३ लाख ५० हजार कोरियन औषधे, पारंपरिक खाद्यपदार्थ आणि निरनिराळ्या सांस्कृतिक वारशांची माहिती या ठिकाणी वाचायला मिळते. हा संग्रह कोरियन आणि इंग्रजी भाषांमध्ये उपलब्ध आहे.

**३) Chinese traditional medicine database system :**

चीनचा हा पारंपरिक ज्ञानाचा माहितीकोश चिनी पारंपरिक औषधांवर आधारित आहे. यातील बहुतेक औषधांच्या लिखित नोंदी चिनी प्राचीन ग्रंथांमध्ये सापडतात. या सर्व नोंदी चिनी भाषेत आहेत. भाषेचा कोणताच अडसर नसल्याने हे ज्ञान चिनी समाजाला पूर्वापार अवगत आहे. पारंपरिक चिनी औषधांशीसंबंधित ऑनलाईन सेवाही चीनने सुरू केली आहे. या वरील माहिती सीडींच्या रूपातही उपलब्ध आहे.

लिखित स्वरूपात असणा-या ज्ञानाची माहिती संकलित आणि संग्रहित करणे हे तसे सोपे काम होते. पण, मौखिक ज्ञान गोळा करून त्याचा संग्रह करणे हे आव्हान आहे. कारण या ज्ञानाला सांस्कृतिक रीतीरिवाज, लोककथा, मिथके, शेतीपध्दती, बांधकामाचे तंत्र, वेशभूषा, केशभूषा यांच्या परंपरांतून बाजूला काढून त्यांचे दस्तऐवजीकरण करावे लागणार आहे. या पार्श्वभूमीवर, परंपरागत शेतीच्या पध्दती, आहार, संवर्धनाच्या पध्दती यांची माहिती असलेला व्हेनेझुएलाचा BioZulua आणि दक्षिण आफ्रिकेचा Ulwazi हे माहितीकोश उल्लेखनीय असेच आहेत.

वैद्यकीय ज्ञानाच्या माहिती संकलनाचे काम आता बहुतेक देशांत ब-यापैकी मार्गी लागले आहे. पण मौखिक ज्ञानाच्या बांधणीचे काम अद्याप म्हणावेसे झालेले नाही. हा ज्ञानाचा साठा अथांग आहे आणि तो पूर्वापार चालत आलेल्या समृध्द संस्कृतीच्या जतनासाठी आवश्यक आहे. ■■

# अपयशी तरीही प्रेरणादायी...

साहसाची प्रेरणा माणसाला उपजतच असावी. त्यामुळेच एकाने साहसाची शर्थ करून नोंदवलेला विक्रम लागलीच मोडण्याची खुमखुमी दुस-यामध्ये निर्माण होते. आधुनिक काळात, आधुनिक उपकरणे आणि संरक्षक साहित्याची मदत घेऊन केलेली साहसे ही जरी धाडसी कृत्ये असली तरी त्यांतील धोका एका मर्यादेपर्यंत कमी झाल्यामुळे ते साहस यशस्वी होण्याची शक्यता वाढलेली असते. पण ज्या काळात अशी संरक्षक साधने नव्हती, त्या काळात केलेली साहसे जिवावर उदार होऊनच करावी लागत. केवळ निधडी छाती आणि दुर्दम्य इच्छाशक्ती यांचीच काय ती मदत या साहसवीरांना असे. म्हणूनच या साहसवीरांचे साहस अयशस्वी झाले, तरी त्यांचा पराक्रम येणा-या पिढ्यांना साहसाची प्रेरणा देत आला आहे.

Nick Piantanida हा अमेरिकेतील असाच एक साहसवेडा! अचाट आयुष्य जगण्याची वृत्ती त्याच्या रक्तातच असावी. दहा वर्षांचा असतानाच त्याने चादरीचे पॅराशूट करून आपल्या राहत्या इमारतीच्या छतावरून उडी मारण्याचा पराक्रम केला होता. त्यातून तो थोडक्यात वाचला. नंतरच्या काळात मात्र जगातील सर्वांत उंच धबधबा चढण्याचा पराक्रम त्याने केला. राजनागासारखे विषारी सापही कुठल्याही साधनांशिवाय लीलया हाताळले. १९६६ सालच्या फेब्रुवारी महिन्यात तो अशाच एका अफलातून साहसाची तयारी करत होता. आजवर कुठलाही मानव पोचला नाही अशा ठिकाणी उंच अवकाशात बलूनच्या साहाय्याने जाऊन तेथून तो जगातील आजवरची सर्वांत उंच उडी मारणार होता. त्याच्या या प्रयत्नाच्या आधी सहा वर्षे Joe Kittinger याने अशाच प्रकारे पृथ्वीपासून ३१.३ किमी उंच जाऊन उडी मारण्याचा पराक्रम केला होता. Piantanida ला त्याचा हा विक्रम मोडायचा होता. त्यासाठी तीन वर्षे तो कसून सराव करत होता. आज अखेर ती वेळ आली होती. सर्वच गोष्टी मनाप्रमाणे घडत होत्या. Piantanida चे गोंडोल एका मोठ्या बलूनला जोडले गेले आणि तो आकाशात उंच-उंच जाऊ



लागला. ३७.६ किलोमीतरचे अंतर त्याने अवघ्या दोन तासांत कापले आणि तो आणखी उंच जाऊ लागला. त्याच्या या उंचीपर्यंत आजवर कुठलाच मानव पोचलेला नव्हता. आणखी उंचीवर पोचल्यावर त्याने हलकेच समोरचा पडदा बाजूला केला. दूरवर दिसणा-या पृथ्वीच्या अर्धगोलावर नकळत त्याची नजर स्थिरावली. पृथ्वीच्या विलोभनीय निळसर छटा पाहून क्षणभर त्याचे भान हरपले. पण लगेचच तो भानावर आला.

Piantanida चे अंतरिक्षयान म्हणजे एक ॲल्युमिनियमचा सांगाडा असलेला आणि प्लॅस्टिकचे आवरण असलेला अवाढव्य फुगा होता. अवकाशाच्या सीमारेषेवर पोचल्यावर त्याने आपला संरक्षक पट्टा काढला आणि बलूनला खाली जोडलेल्या गोंडोलात उभे राहण्याचा प्रयत्न केला. त्याच्या थोड्या हालचालींनीही गोंडोलचा तोल जात होता. आता त्याला अवकाशाच्या पोकळीत स्वतःला झोकून द्यायचे होते. पहिले २७ किलोमीटचे अंतर तो सुपरसॉनिक वेगाने कापणार होता. पृथ्वीच्या गुरु त्वबलाच्या दिशेने तो खाली येणार असल्याने या काळात ध्वनीच्या वेगापेक्षाही त्याचा वेग जास्त असणार होता. खाली येण्यासाठी लागणारा वेळ सेकंदात मोजणार असले तरी Piantanida ला मात्र जमिनीवर पोचण्यासाठी काही मिनिटांचा अवधी लागणार होता. जमिनीपासून आठ किलोमीटरवर असताना तो त्याचे पॅराशूट उघडणार होता आणि ग्लायडिंग करत जमिनीवर पाय टेकवणार होता. हे सर्व सुरळीत पार पडले तर त्याच्या नावावर एका जागतिक विक्रमाची नोंद होणार होती. एवढ्या वेळेपर्यंत तर सर्व काही आलबेल चालू होते. पण अचानक त्याच्यासमोर एक समस्या उभी ठाकली. गोंडोलातील टाकीतून होणारा प्राणवायूचा पुरवठा अपेक्षेनुसार दसपटींनी वाढलेला नव्हता. त्यातच भर म्हणून की काय, तो गोंडोलला घट्ट बांधला गेला होता. आपली ही अवघड परिस्थिती त्याने आपल्या सहका-यांना कळवली. त्याची ही अवस्था बघून फ्लाइट डायरेक्टर Ed Yost ने गोंडोल बलूनपासून ताबडतोब वेगळे करण्याचा निर्णय घेतला. गोंडोलच्या वरच्या भागाला जोडलेल्या कार्गो पॅराशूटपर्यंत Piantanida ला १५ मीटर खाली आणण्याचे ठरले. यात अडचण एकच होती, या सर्व गोष्टी रिमोट कंट्रोलने कराव्या लागणार होत्या आणि आजवर या गोष्टी करण्यासाठी रिमोट

कंट्रोलचा वापर या आधी कधीच केलेला नव्हता. त्या नंतर उभे ठाकलेले प्रश्न तर आणखी गंभीर होते. कार्गोशूट अवकाशाच्या पोकळीत उघडेल का? गोंडोल बलूनपासून वेगळे झाल्यावर वेगाने खाली येऊन कोसळेल का? Piantanida व्यवस्थित तरंगत राहील ना? या उपक्रमातील सर्व तंत्रज्ञ आता चिंताक्रांत झाले होते. Piantanida गोंडोलच्या बाहेर फेकला तर जाणार नाही ना याची चिंता प्रत्येकाला वाटत होती. त्यांनी उलट गणती सुरू केली. Yost ने बलून प्रज्वलीत केला आणि एखादा दगड उंचावरून पडावा तसे गोंडोल वेगाने खाली येऊ लागले. Piantanida ची पत्नी Janice त्याच्या इतर सहका-यांसमवेत रेडिओच्या रिसिव्हरला कान लावून बसली होती. आता सर्वजण Piantanida च्या आवाजाची प्रतीक्षा करत होते. रेडिओवरची शांतता असह्य होत होती. १५ सेकंदांचा काळ गेला आणि अचानक सर्वांनी Piantanida चा काळजीयुक्त आवाज ऐकला. सर्वांनी पाहिले तर झपाट्याने खाली येणारे गोंडोल ४५ अंशाच्या कोनामध्ये झुकले होते. Piantanida चा संरक्षक पट्टा निघाला होता आणि तो लोंबकळत होता. २९ किलोमीटरवर आल्यानंतर कार्गोशूट एका जबरदस्त तडाख्याने उघडले आणि गोंडोल वेडीवाकडी वळणे घेत खाली येऊ लागले. त्यामुळे Piantanida ही झोकांड्या खात खाली येऊ लागला. अवकाशाच्या उंबरठ्यावरून उडी मारण्याचा प्रयत्न Piantanida च्या जिवावर बेतला होता. त्यातून तो थोडक्यात बचावला. ३७.६ किलोमीटर उंचीवर कुठल्याही ऊर्जास्रोताशिवाय पोहोचून स्वतःला त्या पोकळीत झोकून द्यायचे, हे साहस जगावेगळेच होते. Piantanida या प्रयत्नात असफल झाला तरी त्याने कच खाल्ली नाही. आणखी तीनच महिन्यांनी त्याने पुन्हा प्रयत्न केला. दुर्दैवाने या वेळी त्याला आपले प्राण गमवावे लागले. सर्वाधिक उंचीवरून उडी मारण्याचे Piantanida चे स्वप्न अधुरे राहिले तरी ३७.६ किलोमीटर उंचीवर कुठल्याही ऊर्जास्रोतांशिवाय पोचणारा तो पहिला आणि अखेरचा माणूस ठरला. त्याच्या नावावरचा हा विक्रम आजही अबाधित आहे. Piantanida त्याच्या प्रयत्नात अपयशी ठरला तरी त्याचे साहस आजही प्रेरणादायी आहे. त्या अर्थाने त्याची ती उडी इतिहासात अजरामर झाली आहे. ■■



(पृष्ठ २२ वरून)

Pennebaker यांच्या या पद्धतीचा उपयोग 'Lie Detection' च्या क्षेत्रातही करून घेणे शक्य आहे त्यांनी स्वतः या कामात पुढाकार घेतला आहे आणि त्यासाठी Linguistic Lie Detector सारखी प्रयोगशाळाही उभारली आहे. या संदर्भातील त्यांचे सुरुवातीचे निष्कर्ष तरी आश्वासक आहेत.

आजवर आपल्या जाणिवेच्या पलिकडे असलेली ही सर्वनामांची दुनिया अजब अशीच आहे. संख्येने मूठभर असलेले हे शब्द भाषेचा सगळा डोलारा सांभाळतात. विचारांना आकार देतात, भावनांना मुक्त वाट करुन देतात. एका अर्थाने भाषेला अक्षरशः जिवंत करतात. भाषेच्या ओंजळीत Content words ची रोज नव्याने भर पडतच असते. पण भाषेच्या जन्मापासून तिची साथसंगत करणारे हे Function words तिच्या अस्तित्वाचे खरे साक्षीदार आहेत. स्वतःला अंगभूत असा काही एक अर्थ नसतानाही हे शब्द भाषेला अर्थ बहाल करतात. त्यांच्या सामर्थ्याविषयी आजवर आपण अनभिज्ञ होतो. Pennebaker यांच्या अभूतपूर्व संशोधनाने या शब्दांचे कर्तृत्व आणि महत्त्व आता सगळ्यांच्या विचारकक्षेत प्रस्थापित झालेले आहे. ■■

**मौज प्रकाशन गृह आणि भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी यांच्या संयुक्त विद्यमाने नवे प्रकाशन**

**उदारमतवादाच्या संस्कृतीचे बीजारोपण करीत १९व्या शतकातील भारतीय प्रबोधनास आकार देणा-या रानडे-तेलंग-चंदावरकर या तीन लोकोत्तर व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा विश्लेषक आलेख**

## तीन न्यायमूर्ती आणि त्यांचा काळ

**लेखक - नरेन्द्र चपळगावकर**

**पृष्ठे : ३१५ किंमत : ३००/- रुपये**

**समाजपुरुषांचा वारसा आणि वसा यांचे उचित भान आणून देणारा संशोधनपूर्ण वाचनीय दस्तऐवज**

**उजळणी**

# स्मरण, प्रेरक आणि मार्गदर्शक बोलांचे...

बाबासाहेबांच्या विचारविश्वातील या ठिकाणी सादर केलेले अंश हे १९३४ ते १९३६ या काळात त्यांनी वेळोवेळी व ठिकठिकाणी केलेल्या भाषणांमधील आहेत. बाबासाहेबांच्या आंतरिक विश्वात त्या काळात उसळलेल्या विचारकल्लोळांचे नेमके दर्शन आपल्याला त्यांद्वारे सम्यक्पणे घडते. धर्मांतराच्या दिशेने त्या काळात बाबासाहेबांचे चिंतन अतिशय ठोसपणे चालू झालेले होते. जीवनातील हे अभूतपूर्व पाऊल आपण एकट्याने उचलावयाचे नाही तर, तथाकथित 'दलित' म्हणून पिढ्यान्पिढ्या अवमानल्या गेलेल्या समाजसमूहांना बरोबर घेऊन आपण हा प्रवास करावयाचा आहे, असा ठाम निश्चयच बाबासाहेबांनी मनाशी केलेला होता. त्या दृष्टीने संबंधित समाजसमूहांची मानसिक तयारी बाबासाहेब किती अंगांनी करू पाहत होते, याच्या पाउलखुणा त्यांच्या पुढील वचनांद्वारे आपल्या पुढ्यात उमटतात. आज सगळेच संदर्भ बदललेले असले तरी बाबासाहेबांच्या बोलांतील निरंतरत्व आणि द्रष्टेपण भावल्यावाचून राहत नाही.

### *(१) बापाचे मोठेपण मुलाच्या कामी येणार नाही...*

*"पुढील काळात प्रत्येकाने कर्तबगार बनण्याचा प्रयत्न केला पाहिजे. बापाच्या नावावर खपण्याची हाव सोडून मी स्वतः काहीतरी करून दाखवीन अशी महत्त्वाकांक्षा मनात स्मरण केली पाहिजे. याबाबतीत मला एक साधा दृष्टांत द्यावासा वाटतो. एक सुभेदाराच्या मुलाची गोष्ट माझ्या पाहण्यात आहे. या गृहस्थाचा नेहमी असा अट्टाहास असे की लोकांनी आपल्यास, बापाप्रमाणेच सुभेदार म्हणावे. याकरता आपल्या खोलीच्या दारावरील नावाच्या पाटीवर देखील सुभेदार ही पदवी तो लावीत असे. सुभेदार म्हणून जर कोणी बोलविले तरच आपण तेथे जावयाचे असे त्याचे वर्तन असे. अर्थातच, मिलिटरीमधील ही मानाची पदवी त्याच्या बापाची असून ती या मुलाने कमविलेली नाही हे जाणून लोक सुभेदार ही पदवी त्यास बहाल करण्यास*



*तयार झाले नाहीत. या इसमाने कोणत्याही प्रकारे आपली लायकी वाढविण्याचा प्रयत्न केला नाही व आपल्या मूर्खपणाचे केवळ प्रदर्शन करून तो लोकांच्या उपहासास मात्र प्राप्त झाला. करिता भूतकालीन मोठेपणाचा वृथा अभिमान बाळगणे हे व्यर्थ आहे. अंगी मोठेपणा आणण्यास मनुष्याने स्वतःच झटले पाहिजे. बापाचे मोठेपण मुलाच्या कामी येणार नाही. आणि ही योग्यता अंगी आणण्याकरिता शिक्षण संपादन करण्यासारखा दुसरा उपाय नाही".*

### *(२) मते विकणे हा आत्मघात आहे...*

*'सध्या आपल्या देशात सधन लोक मते विकत घेतात, पण मते ही विकण्याची वस्तू नाही. ती आपले संरक्षणाची साधनशक्ती आहे. मते विकणे हा गुन्हा तर आहेच शिवाय तो आत्मघातही आहे. मते विकून नालायकांची खोगीरभरती कायदेमंडळावर केल्याने देशाचे अपरिमित निकसान होऊन राष्ट्र अधोगतीस जाते. स्वतः नालायक व अपात्र असून पैशाचे जोरावर कायदेमंडळावर जाऊइच्छिणारे काही लोक तुम्हास द्रव्याचे आमिष दाखवतील, दारिद्र्यामुळे तुम्हास मते विकावी की काय असा मोह उत्पन्न होईल. अशा कोणत्याही मोहास तुम्ही बिलकूल बळी पडू नका. मोहास बळी पडलात तर तुम्ही आपल्या पायावर पर्यायाने समाजाच्या पायावर धोंडा पाडून घ्याल... मते विकत मागणा-या माणसाला समाजाचा पाठिंबा नसतो म्हणून तर तो द्रव्याच्या बळावर आपली लायकी प्रस्थापित करण्याचा अट्टाहास करतो. अशा नालायक माणसाकडून समाजहिताची अगर राष्ट्रहिताची कार्ये होत नाहीत. पैसेवाला जर कायदेमंडळात सभासद म्हणून गेला, तर तो द्रव्यवाल्या लोकांचेच हितसंरक्षण करील व तो आपल्यासारख्या गोरगरिबांच्या हिताच्या आड येईल. म्हणून मत विकण्याचे पाप तुम्ही करू नका व तसे तुम्ही करणार नाही अशी माझी खात्री आहे. पैसेवाल्यांच्या कसल्याही प्रकारच्या आमिषाला व भुलभुलावणीला, गोडीगुलाबीच्या मायावी भाषणाला आणि पैशाला तुम्ही बळी पडू नका व आपली दिशाभूल करून घेऊ नका. आपणाला मिळालेल्या मतदानाच्या अधिकाराचा जर आपण चांगल्या त-हेने उपयोग केला तर आपण चांगलीच माणसे कायदेमंडळावर निवडून आणू व आपली उन्नती आपण करूशकू".*

### *(३) व्यक्तीचा विकास हेच धर्माचे खरे ध्येय आहे...*

*"समाजाच्या धारणेकरीता घातलेली बंधने म्हणजेच धर्म.. ही व्याख्या वास्तविकदृष्ट्या अथवा तार्किकदृष्ट्या योग्य अशी दिसली तरी समाजाच्या धारणेकरिता समाजाची बंधने कशा प्रकारची असावीत या प्रश्नाचा व्याख्येवरून काहीच बोध होऊ शकत नाही.. समाजाच्या योग्य धारणेकरिता समाजाची बंधने कशी असावीत हा प्रश्न शिल्लक राहतोच व हा प्रश्न धर्माच्या व्याख्येपेक्षा फार महत्त्वाचा आहे. कारण धर्म कोणता व अधर्म कोणता हे व्याख्येवर अवलंबून नसून बंधनांच्या हेतूवर व स्वरूपावर अवलंबून आहे. ज्या बंधनांनी समाजातील सर्व प्रजेची धारणा होऊ शकते ती बंधने कशी असावीत, म्हणजे ख-या धर्माचे स्वरूप कसे असावे याचा विचार करताना समाज आणि व्यक्ती यांचा तात्त्विकदृष्ट्या संबंध काय असावा हा प्रश्न साहजिकपणेच उद्‌भवतो. या प्रश्नासंबधाने आधुनिक समाजशास्त्रवेत्यांनी तीन प्रकारची मते प्रतिपादन केलेली आहेत. काहींच्या मते व्यक्तीमात्राला सुखप्राप्ती व्हावी हाच समाजघटनेचा अंतिम हेतू आहे. काहींच्या मते व्यक्तीमात्राला त्यांच्या अंगभूत गुणांचा व शक्तीचा विकास करता येऊन त्याला पूर्णावस्थेस पोहोचविण्यास मदत व्हावी हाच समाजसंघटनेचा अंतिम हेतू असला पाहिजे व काहींच्या मते समाजसंघटनेचा मुख्य हेतू व्यक्तीची उन्नती किंवा व्यक्तीचे सौख्य हा नसून आदर्शभूत समाज तयार करणे हाच होय. हिंदू धर्माची कल्पना या तीनही कल्पनांहून अगदी निराळी आहे. हिंदू धर्मात व्यक्तीला काही स्थान नाही. हिंदू धर्माची रचना वर्गाच्या कल्पनेवर केलेली आहे. एकाने दुस-याशी कसे वागावे याची शिकवण हिंदू धर्मात नाही. एका वर्गाने दुस-या वर्गाशी कसे वागावे याची बंधने हिंदू धर्मात आहेत. ज्या धर्मात व्यक्तीला प्राधान्य नाही तो धर्म मला स्वतःला मान्य नाही. व्यक्तीच्या जीवनाला समाजाची जरी आवश्यकता असली तरी समाजाची धारणा हे धर्माचे अंतिम ध्येय होऊ शकत नाही. व्यक्तीचा विकास हेच धर्माचे खरे ध्येय आहे असे मी समजतो. व्यक्ती ही जरी समाजांतर्गत असली, मनुष्यमात्र हा जरी समाजाचा एक घटक असला तरी त्याचा आणि समाजाचा संबंध शरीर आणि अवयव, गाडा आणि त्याचे चाक यांचा संबंध आहे तसा हा संबंध नव्हे..."* ■■.



*(पृष्ठ क्रमांक ४ वरून)*

अखेर राजकारण हे त्याच्या गतीनेच चालणार हे उघड असले तरी निखळ राजकीय लाभ नजरेसमोर ठेवून घेतलेल्या निर्णयांचे अपेक्षित-अनपेक्षित असे जे आर्थिक परिणाम संभवतात त्यांचा नकाशा नजरेसमोर उलगडण्यास प्रा. रथ यांनी त्यांच्या लेखात मांडलेली आकडेवारी व तिच्यावर बेतलेले विश्लेषण उपयोगी ठरावे. आपल्या देशातील गोधनाच्या चित्रामधून डोकवणारे प्रा. रथ यांनी त्यांच्या विवेचनामध्ये मांडलेले बदलते वास्तव आपल्या सगळ्यांनाच अंतर्मुख बनवणारे असे आहे. राजकारण आणि अर्थकारण यांच्यादरम्यानच्या संबंधांचा पुनर्विचार वेळोवेळी आणि तटस्थतेने करण्याची गरज त्यांतून अधोरेखित व्हावी. विचार करणे ही जर मानवी अस्तित्त्वाची आद्य खूण मानली तर, जीवनाच्या अंगोपांगांविषयीचा सतत होत राहणारा व गरजेचा ठरणारा पुनर्विचार हा विस्तारणा-या मानवी प्रगल्भतेचा पुरावा ठरतो. मानवी भावभावनांचे प्रगटीकरण घडवणा-या भाषाव्यवहाराच्या प्रांतात अलीकडील काळात घडून येत असलेले मेंदुसंशोधनाधारित नवशोधन व चिंतन उभ्या भाषाविश्वासंदर्भातील आपल्या आजवरच्या आकलनाला कलाटणी देणारे असेच आहे. साध्या साध्या सर्वनामांच्या वापराद्वारे मानवी अस्तित्त्वाचे तसेच विचारप्रक्रियेचे किती पदर-उपपदर उलगडले जातात यांबाबत काही विचक्षण भाषावेत्यांनी अलीकडे सिध्द केलेले संशोधन आपले विचारविश्व अंतर्बाह्य उजळून टाकणारे असेच आहे. विचारांची ही दिशा आणि तिच्या पाठपुराव्याद्वारे हाती येणारे निष्कर्षांचे काही कण ही सगळीच शोधप्रक्रिया आज बाल्यावस्थेमध्ये असली तरी भवतालाबद्दलची जबाबदार उत्सुकता मनीमानसी वागवत जीवनाच्या अनेक प्रांतांत पुनर्विचाराची प्रेरणा संजीवित ठेवण्याची आवश्यकताच त्यांतून अधोरेखित होते. समाजामध्ये परंपरेने संग्रहित होत आलेले ज्ञान हा मानवी व्यवहारांचा एक मोठा मार्गदर्शक आधार असतो. आजही मौखिक व्यवहाराची वेस न ओलांडलेल्या त्यांतील एका मोठ्या अंशाचे दस्तऐवजीकरण होणे हे पुनर्विचाराच्या प्रक्रियेला खाद्य पुरविणारे साधनच ठरते. अनेकानेक ज्ञानशाखांमध्ये आजमितीस साकारत असलेल्या पुनर्विचाराच्या प्रवाहांची झलक सादर करण्याचा नम्र प्रयत्न या अंकामध्ये केलेला आहे. ■■

**प्रमुख संदर्भ**

**(A) Magazines -** (1) Current Science : 24 October 2014 (2) New Scientist : 3 September 2011 (3) New Scientist : 21 July 2012.
**(B) Books/Reports -** (1) Orissa Review, May-June, 2010.
(2) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणेः भाग १ : १९२० ते १९३६, डॉ. बाबासाहेब आंबेडकर : लेखन आणि भाषणे : खंड १८, भाग १, २००२, पृष्ठ क्रमांक ४२४, ४६६-६७ आणि ४९९-५००. **(C) Websites -** (1)http://www.amazon.com.in/The-Secret-Life-Pronouns-Words/dp/1608194 (2) http://www.scientificamerican.com/article/the-secret-language-code/ (3) http:// en.wikipedia.org/wiki/Traditional-knowledge-Digital-Library. ■■



# Poverty in India

**लेखक वि.म. दांडेकर, नीळकंठ रथ**

**(पृष्ठे १४०, किंमत : २०० रुपये)**

**अर्थकारण-समाजकारणाचे जिज्ञासू, साक्षेपी संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी अशा सर्वांना उपयुक्त असा मौलिक ग्रंथ**

## दुसरी आवृत्ती प्रकाशित

*आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव पाडणा-या क्रांतिकारी मेंदूसंशोधनावरील आकर्षक, सचित्र व संग्राह्य ग्रंथ*

# कर्ता-करविता

## आधुनिक मेंदूसंशोधन व आपले जीवन

**लेखक - रमेश पानसे, राज्यश्री क्षीरसागर, अनिता देशमुख-बेल्हेकर**

**मराठी भाषेला अभिमान वाटावा असे पुस्तक - डॉ. ह. वि. सरदेसाई**

●मेंदूसंशोधन ही एक क्रांतीच! मानवी जीवनाला अधिक उच्च टप्प्यावर नेणारी ऐतिहासिक घटना! या क्रांतीचा आलेख रेखाटणारा ग्रंथ.

**पृष्ठे २४२** **किंमत ३५०/-रु पये**




## भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

### 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक ॲन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

## 'अर्थबोधपत्रिका' वर्गणीदारांसाठी विशेष योजना

**वार्षिक वर्गणी फक्त १०० / - रुपये**

**द्वैवार्षिक वर्गणी फक्त १८०/ - रुपये**

**त्रैवार्षिक वर्गणी फक्त २६०/ - रुपये व एक पुस्तिका भेट**

**पंचवार्षिक वर्गणी फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट**

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये)
(२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी)
(३) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये)

## *ग्रंथालयातील पुस्तके*

**Migration in India, Shekhar Mukherji, Rawat Publications, Jaipur, 2013, pp. 512, Price Rs. 1295/-**

विस्थापन, त्यातून होणारे बेसुमार आणि अत्यंत निकृष्ट दर्जाचे शहरीकरण आणि त्याचा परिणाम म्हणून वाढणारा प्रादेशिक असमतोल हे सगळेच प्रश्न एकमेकांशी निगडीत आहेत. गेल्या काही दशकांत ओस पडत चाललेली खेडी, लोकसंख्येने फुगलेली आणि बकाल बनलेली शहरे हे प्रश्न नजीकच्या काळात आणखीनच उग्र रुप धारण करणार आहेत. त्यांचा वेळीच अभ्यास करुन योग्य अशी उपाययोजना केली गेली नाही तर कदाचित हा प्रश्न हाताबाहेरही जाण्याची शक्यता आहे. विस्थापन ही प्रक्रिया जटील स्वरुपाची आहे. विस्थापन केवळ एका व्यक्तीचे नसते तर कुटुंबाचे असते. त्यामुळे निर्माण होणारे माणसांचे, समाजाचे, प्रादेशिकतेचे प्रश्न खूप गंभीर आहेत. आज भारतातील एकूण लोकसंख्येपैकी एक तृतीयांश लोक स्थलांतरीतांचे आयुष्य जगत आहेत. गरिबी, कुपोषण आणि बेरोजगारी या कारणांस्तव विस्थापन होते. पण त्यामुळे विस्थापितांच्या जगण्यात मात्र काडीचा फरक पडलेला नाही. उलट त्यांचे शोषण आणखीनच वाढलेले आहे. या परिस्थितीवर उपाययोजना करायची असेल तर या प्रश्नाचा व्यापक अभ्यास आणि संशोधन होण्याची गरज आहे. वरील सर्व घटक एकमेकांवर अवलंबून असल्याने त्यांबाबत एकत्रित संशोधन होणे गरजेचे आहे. पण अशा प्रकारच्या दृष्टिकोनाचीच भारतात वानवा आहे. प्रस्तुतच्या पुस्तकात विस्थापन, शहरीकरण आणि प्रादेशिक विषमता या परस्परावलंबी घटकांचा एकत्रित अभ्यास वाचायला तर मिळतोच; शिवाय या विषयाचे संशोधन करण्याच्या नवीन पध्दती आणि दृष्टिकोन यांची माहितीही आपल्याला मिळते. समाजशास्त्रीय संशोधनात त्या अर्थाने या पुस्तकाची ही फार मोलाची भर पडलेली आहे. त्यामुळेच भूगोलतज्ज्ञ, लोकसंख्यातज्ज्ञ, अर्थतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, व्यवस्थापनतज्ज्ञ तसेच शासकीय धोरणे ठरविणारे अधिकारी यांच्यासाठी हे पुस्तक उपयुक्त ठरावे. ■■



**RNI Regn.No. MAHMAR/2002/9806**
**Postal Regn.No.: PCW/115/2013-2015**
**Posted at Model Colony Post Office Pune, on 10th of each month**

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग -व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य/पत्रके/ पुस्तिका प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक ('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते.

■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात.

■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणा-या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**- संस्थेचे नियंत्रण मंडळ -**

●विकास चित्रे ● किशोर चौकर ●सुरिंदर जोधका ●रमानाथ झा
●अभय टिळक ●रवींद्र ढोलकिया ●ललित देशपांडे ●दिलीप नाचणे
●सुहास पळशीकर ●मनोहर भिडे ●नीळकंठ रथ ●रूपा रेगे-नित्सुरे
●ए.वैद्यनाथन ●एस. श्रीरामन

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक व्ही. एस. चित्रे यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**